मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : २५० ■ शनिवार, २३ मे २०२६ ■ किंमत : २ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




# १५ ऑगस्टपर्यंत रिक्षा-टॅक्सी चालकांना व्यावहारिक मराठी शिकणे सक्तीचे – परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

**मुंबई : राज्यातील प्रवाशांसोबत रिक्षा-टॅक्सी चालकांना मराठीत संवाद साधता यावा, यासाठी त्यांना मराठी भाषा शिकविण्याची राज्य शासनाची भूमिका असल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट केले. अमराठी रिक्षा-टॅक्सी चालकांनी १५ ऑगस्टपर्यंत व्यावहारिक मराठी भाषा ऑनलाईन अथवा प्रत्यक्ष प्रशिक्षण केंद्रांमध्ये शिकणे सक्तीचे असून, १६ ऑगस्टनंतर कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही. तसेच नियमांचे पालन न करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.**



रिक्षा-टॅक्सी चालकांसाठी मराठी भाषा प्रशिक्षणासंदर्भात मंत्रालयात आयोजित बैठकीत मंत्री सरनाईक बोलत होते. या बैठकीस परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर, सहआयुक्त रवी गायकवाड, संदेश चव्हाण, मराठी भाषा विभागाचे सहसचिव डॉ. ना.कों. भोसले, राज्य मराठी विकास संस्थेचे संचालक डॉ. श्यामकांत देवरे, प्रा. सुहासिनी किर्तीकर, डॉ. ज्योती ठाकरे, डॉ. उज्ज्वला मेहेंदळे, प्रा. डॉ. प्रदीप ढवण, अरुण म्हात्रे, मीनाक्षी जयकर, स्वाती गावडे, शिवाजी गावडे, दीपा ठाणेकर, मोहन पाटील आदी उपस्थित होते.

मंत्री सरनाईक म्हणाले की, मराठी भाषेचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी परिवहन विभागाने पुढाकार घेतला आहे. त्यानुसार परिवहन विभाग, कोकण मराठी साहित्य परिषद आणि मुंबई मराठी साहित्य संघ यांच्या माध्यमातून राज्यभरात मराठी भाषा अभ्यास केंद्रे उभारण्यात येणार आहेत. तसेच रिक्षा संघटना आणि शिवसेना शाखांमधील उपलब्ध जागांमध्येही ही केंद्रे १५ ऑगस्टपर्यंत सुरू राहणार आहेत.

रिक्षा-टॅक्सी चालकांनी ऑनलाईन किंवा आपल्या परिसरातील प्रत्यक्ष केंद्रांमध्ये जाऊन मराठी भाषा शिकून घ्यावी, असे आवाहनही त्यांनी केले.

या प्रशिक्षणात सुमारे चार हजार शिक्षक सहभागी होणार असून, प्रत्येक महिन्यातील चार शनिवार आणि रविवार चालकांच्या सोयीप्रमाणे किमान चार तासांचा अभ्यासक्रम पूर्ण करावा लागणार आहे. काही शिक्षक मानधनाशिवाय प्रशिक्षण देणार असून, काहींना प्रति तास एक हजार रुपये मानधन देण्यात येणार आहे.

**प्रशिक्षणासाठी करण्यात आलेली तयारी :**

**सचित्र आणि सोप्या भाषेतील पाठ्यक्रम पुस्तिका.**
**प्रत्येक केंद्रांतर्गत उपकेंद्रे उभारली जाणार.**
**रिक्षा-टॅक्सी तसेच ओला, उबेर, रॅपिडो वाहनांवर मराठी संदर्भातील जनजागृती स्टिकर्स लावले जाणार.**
**मराठी भाषा प्रचार-प्रसारासाठी विशेष बॅनर्स तयार करणार.**

**मानधनासाठी मराठी भाषा विभागाकडून दोन कोटी रुपयांची तरतूद**

मराठी भाषा प्रशिक्षणासाठी आवश्यक मानधनाच्या खर्चासाठी मंत्री सरनाईक यांच्या विनंतीनुसार मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी पुढाकार घेतला आहे.

त्यासाठी दोन कोटी रुपयांचा प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना त्यांनी दूरध्वनीद्वारे संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. उर्वरित खर्च परिवहन विभागामार्फत करण्यात येणार आहे.

**प्रशिक्षणानंतर चालकांना प्रमाणपत्र**

रिक्षा-टॅक्सी चालकांनी या उपक्रमात सहभागी होऊन यशस्वीरीत्या प्रशिक्षण पूर्ण केल्यास त्यांना परिवहन विभागामार्फत प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. यासाठी चालकांची मराठी भाषेवरील व्यवहारिक क्षमता तपासण्यासाठी प्रशिक्षण केंद्रांमध्ये तोंडी परीक्षा घेतली जाणार असल्याची माहितीही मंत्री सरनाईक यांनी दिली.

परिवहन विभाग, कोकण मराठी साहित्य परिषद आणि मुंबई मराठी साहित्य संघ यांनी प्रशिक्षण केंद्रांची अंतिम यादी निश्चित करून ऑनलाईन आणि ऑफलाईन सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

रिक्षा-टॅक्सी चालकांची मंगळवारी बैठक आयोजित करण्यात आली असून, त्यांनी विनामूल्य उपलब्ध असलेले ऑनलाईन अथवा ऑफलाईन प्रशिक्षण घेऊन व्यावहारिक मराठी आत्मसात करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.


चालकांच्या वेळेनुसार प्रशिक्षणाची व्यवस्था केली जाणार असली, तरी १५ ऑगस्टपर्यंत मराठी भाषा शिकली नाही तर संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल,

असा पुनरुच्चार मंत्री सरनाईक यांनी केला.

## सोयगावच्या रामचंद्र लाठे यांची SRPF मध्ये निवड

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी विजय काळे :** संघर्षमय परिस्थितीतून अथक मेहनत, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर सोयगाव शहरातील युवक रामचंद्र लाठे यांनी अखेर पोलीस SRPF मध्ये निवड मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. तब्बल १२ वर्षांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नानंतर मिळालेल्या या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.रामचंद्र लाठे यांनी १८३ गुण मिळवत हे घवघवीत यश मिळवले.अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण आणि



सराव सुरू ठेवत त्यांनी अनेक अडचणींवर मात केली.अपयशाने खचून न जाता आत्मविश्वास आणि मेहनतीच्या बळावर त्यांनी अखेर यशाला गवसणी घातली. आमखेडा येथील फोजी कृष्णा सपकाळ व प्राध्यापक सचिन ढगे सर यांच्या मार्गदर्शनाखाली कुरुक्षेत्र अकॅडमीमध्ये त्यांनी स्पर्धा परीक्षेची तयारी केली. विद्यार्थ्यांच्या यशासाठी सातत्याने प्रयत्न करणाऱ्या अकॅडमीच्या मार्गदर्शनामुळेच हे यश शक्य झाल्याची भावना व्यक्त होत आहे.रामचंद्र लाठे यांच्या यशामुळे कुटुंबीय, मित्रपरिवार आणि नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन केले जात आहे."मेहनत, चिकाटी आणि आत्मविश्वास यांच्या जोरावर कोणतेही यश मिळवता येते," हे त्यांनी आपल्या यशातून सिद्ध करून दाखवले आहे. स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी सोयगाव तालुक्यात विश्वासार्ह ओळख निर्माण केलेल्या कुरुक्षेत्र अकॅडमीच्या आणखी एका विद्यार्थ्याने मिळवलेल्या यशामुळे अकॅडमीच्या कार्याचेही कौतुक होत आहे.

## परिमंडळ 3 पदाचा कार्यभार पोलिस उपायुक्त रश्मी नांदेडकर यांनी स्वीकारला तर परिमंडळ 1 ची विजय खरात यांच्याकडे जबाबदारी

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, प्रतिनिधी :** नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ 3 चा पदभार आज पोलीस उपायुक्त डॉ.रश्मी नांदेडकर यांनी स्वीकारला आहे. यावेळी विविध अधिकाऱ्यांनी त्यांची भेट घेवून त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. तर परिमंडळ 1 च्या महत्वाच्या ठिकाणी विजय खरात यांच्याकडे जबाबदारी देण्यात आली आहे.

पोलीस आयुक्त भारंबे यांनी महिला अधिकाऱ्यांना महत्त्वाच्या जबाबदाऱ्या देण्यावर भर दिल्याचे





यानिमित्ताने पुन्हा अधोरेखित झाले आहे. नांदेडकर या यापूर्वी विशेष शाखेत कार्यरत होत्या. त्यांना प्रथमच परिमंडळाचा कारभार सोपविण्यात आल्याने नवी मुंबई पोलीस दलात महिला नेतृत्वाला प्राधान्य दिले जात असल्याचे मानले जात आहे. यापूर्वी परिमंडळ-3 अंतर्गत कामोठे पोलीस ठाण्यात विमल बिडवे यांची प्रभारी वरिष्ठ पोलीस निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. तसेच खांदेश्वर पोलीस ठाण्याची जबाबदारी स्मिता ढाकणे यांच्याकडे देण्यात आली. त्यानंतर गुन्हे शाखेच्या सहाय्यक पोलीस आयुक्तपदी प्रेरणा कट्टे यांची नियुक्ती करण्यात आली होती.

परिमंडळ-1 हे नवी मुंबईतील संवेदनशील आणि महत्त्वाचे क्षेत्र मानले जाते. या परिमंडळाची जबाबदारी विजय खरात यांच्याकडे देण्यात आली आहे. नाशिक शहर, अमरावती सीआयडी विभागाचे पोलीस अधीक्षक, रायगड आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यासह मुंबई पोलीस महासंचालक कार्यालयातील दक्षता विभागात कामाचा खरात यांचा अनुभव आहे. तसेच परिमंडळ -3 चे उपायुक्त नांदेडकर यांच्या गाठीशी अकोला जिल्ह्यातील अकोट येथे सर्वाधिक दंगल होणा-या तालुक्यात त्यांनी शांतता राखण्याचे काम यशस्वीरित्या करून दाखवले. त्यानंतर नाशीक एसीपी, भंडारा तेथून नागपूर येथे लाच लुचपत प्रतिबंधक विभाग आणि राज्य गुप्तवार्ता विभाग असा वेगवेगळया ठिकाणी त्यांना कामाचा अनुभव आहे. नवी मुंबई पोलीस दलातील विशेष शाखेची जबाबदारी नांदेडकर यांनी यशस्वीरीत्या सांभाळली होती.








पाटोदा - सय्यद अब्दुल्ला (आबुशेठ) यांना वाढदिवसा निमित्त सत्कार करुन हार्दिक शुभेच्छा देताना. लोकनेते आमदार सुरेश आण्णा धस यांचे स्विय सहाय्यक तथा पाटोदा तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष सोमिनाथ कोल्हे, पाटोदा नगर पंचायतचे माजी उपनगराध्यक्ष तथा नगरसेवक पठाण नय्युम भाई, माजी सभापती तथा नगरसेवक श्रीहरी गिते पाटील, सभापती रामेश्वर गोरे, नगरसेवक संदीप जावळे, रिपाईचे पाटोदा तालुकाध्यक्ष डॉ.नरेंद्र जावळे, नगरसेवक शरद तात्या बामदळे, प्रकाश जावळे सह इतर

(छाया - दैनिक युवक आधार पाटोदा.)

# माहिती अधिकार जिलाध्यक्ष यांच्यावर प्राणघातक हल्ला

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी स्वप्नील काटवले लाखनी भंडारा** : माहिती अधिकार पत्रकार संरक्षण व पोलीसमित्र समितीचे जिल्हा अध्यक्ष तथा 'दैनिक युवक आधार'चे भंडारा जिल्हा प्रतिनिधी भावेशजी धंधुकीया यांच्यावर प्राणघातक हल्ला झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या हल्ल्यात भावेश धंधुकीया हे गंभीर जखमी झाले असून या घटनेमुळे भंडारा जिल्हा आणि पत्रकार वर्तुळात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.



मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, भावेशजी धंधुकीया हे हनुमान देवस्थान चांदपूर येथे त्यांच्या काकाने ठेवलेल्या सुंदरकांड या कार्यक्रमासाठी गेले होते.

**घटना अशी की:**

हनुमान देवस्थान चांदपूर येथे त्यांच्या काकाने(किशोर गिरधारीलाल धंधुकिया जवाहर नगर) ठेवलेल्या सुंदरकांड या कार्यक्रमाला भावेश धंधुकिया व इतर नातलग उपस्थित होते . सुंदरकांड कार्यक्रम संपताच जेवणाचा कार्यक्रम सुरू होणार तितक्यात आरोपी दीपेन धंधुकीया व त्याचाच भाऊ जीतेन धंधुकीया यांच्यात कौटुंबिक मालमत्तेवरून वाद सुरु झाला हा वाद थांबवण्यासाठी भावेश धंधुकिया यांनी दोन भावंडांना समज देण्यासाठी मध्यस्थी केली असता आरोपी दीपेन धंधुकीया याने त्याच्या जवळ असलेल्या धारदार शस्त्राने भावेश धंधुकिया यांच्या डोक्यावर हल्ला करून त्यांना रक्तबंबाळ केले

**पोलिसांची कारवाई:**

या प्रकरणी सिहोरा पोलिसांनी भावेश धंधुकिया यांच्या फिर्यादीवरून आरोपी दिपेन रजनीकांत धंधुकिया याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) कलम 118 (1) आणि 352 अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. या घटनेचा पुढील तपास प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक विजय दामोधर कास यांच्या मार्गदर्शनाखाली सुनील सिंगा कासदे करीत आहेत.

**तीव्र निषेध:**

माहिती अधिकार पत्रकार संरक्षण व पोलीसमित्र समितीचे जिल्हाध्यक्ष तथा 'दैनिक युवक आधार'चे भंडारा जिल्हा प्रतिनिधी भावेशजी धंधुकीया यांच्यावर झालेल्या या भ्याड हल्ल्याची माहिती मिळताच माहिती अधिकार पत्रकार संरक्षण व पोलीसमित्र समिती चे अमृतलाल चरडे भंडारा जिल्हा उपाध्यक्ष यांच्या नेतृत्वात तुमसर तालुक्याचे नितीन बडवाईक तालुका सहसचिव, धनंजय बडवाईक तालुका उपाध्यक्ष, अंशुल चरडे तालुका संघटक, सुनील कांबळे तालुका उपाध्यक्ष व मयूर बडवाई कार्यकारिणी सदस्य आणि जिल्ह्यातील विविध पत्रकार संघटनांनी तीव्र शब्दांत निषेध केला आहे. "लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या पत्रकारांवर आणि सामाजिक कार्यकर्त्यांवर होणारे असे हल्ले खपवून घेतले जाणार नाहीत," अशा भावना पत्रकार बांधवांनी व्यक्त केल्या आहेत. तसेच, आरोपींना २४ तासांच्या आत अटक करून त्यांच्यावर कडक कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही संघटनांच्या वतीने प्रशासनाला देण्यात आला आहे.

**दैनिक युवक आधार'चे भंडारा जिल्हा प्रतिनिधी भावेशजी धंधुकीया यांच्यावर झालेल्या या भ्याड हल्ल्या चा जाहिर निषेध**

**आरोपींना अटक करून कायदेशीर कारवाई तातडीने करावी पत्रकार वरती जीव घेणा हल्ल्याचा कलम लावावा अन्यथा माहिती अधिकार पत्रकार संरक्षण व पोलीसमित्र समिती सोबत महाराष्ट्रातील पत्रकार आंदोलन करतील**

**- डॉ श्री संतोष शिवदास आमले**

**संपादक दैनिक युवक आधार**

## जालना जिल्ह्यात डिझेलचा काळाबाजार थांबवावा व ट्रॅक्टर पेट्रोल पंपावर आणण्याचा नियम रद्द करा- संतोष खारवणे

**दैनिक युवक आधार**

**उपसंपादक महाराष्ट्र -राजु शिंदे :** जिल्ह्यात सध्या डिझेलसाठी पेट्रोल पंपांवर मोठ्या प्रमाणात गर्दी होत असून काही पेट्रोल पंप चालकांकडून कृत्रिम टंचाई निर्माण करून डिझेलचा काळाबाजार केला जात असल्याच्या तक्रारी वाढत आहेत. या पार्श्वभूमीवर युवासेना उपतालुका प्रमुख संतोष खारवणे यांनी जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.



निवेदनात म्हटले आहे की, खरीप हंगाम सुरू होत असल्यामुळे शेतकऱ्यांना ट्रॅक्टर व शेती उपकरणांसाठी मोठ्या प्रमाणात डिझेलची आवश्यकता आहे. मात्र डिझेल भरण्यासाठी ट्रॅक्टर प्रत्यक्ष पेट्रोल पंपावर आणण्याचा नियम असल्याने शेतकऱ्यांना आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत आहे.

तसेच काही पेट्रोल पंपांवर डिझेलसाठी कृत्रिम टंचाई निर्माण करून काळाबाजार केला जात असल्याच्या तक्रारी येत आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व पेट्रोल पंपांची तपासणी करून दोषींवर कठोर कारवाई करावी शेतकऱ्यांना आवश्यक कागदपत्रांच्या आधारे कॅन किंवा ड्रममध्ये डिझेल देण्यास परवानगी द्यावी व ट्रॅक्टर पेट्रोल पंपावर आणण्याचा नियम तात्काळ रद्द करावा, अशी मागणी संतोष खारवणे यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

## शिवसेना महाविकास आघाडीचे मनोज शिवराम कुंभारकर यांची चिंध्रण ग्रामपंचायत उपसरपंच पदी बिनविरोध निवड

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** पनवेल तालुक्यातील चिंध्रण ग्रामपंचायत उपसरपंच पदासाठी बुधवार दिनांक 20 मे रोजी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या उपस्थितीत निवडणूक पार पडली या निवडणुकीसाठी मनोज शिवराम कुंभारकर यांचा एकमेव अर्ज भरल्याने निवडणूक अधिकारी व सरपंच यांनी चिंध्रण ग्रामपंचायत उपसरपंच पदी मनोज शिवराम कुंभारकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली.



मनोज शिवराम कुंभारकर यांनी उपसरपंच पद स्वीकारल्यानंतर हे उपसरपंच पद नसून जबाबदारी आहे मी माझ्या गावाच्या विकासासाठी गावाच्या समस्या सोडवण्यासाठी पूर्णपणे काम करणारा असून वृक्षारोपण तसेच विविध योजना गावासाठी आणण्याचा प्रयत्न करणार असल्याचे उपसरपंच मनोज कुंभारकर यांनी सांगितले

तसेच मान्यवरांनी शुभेच्छा देत तरुण तरुण सहकारी उपसरपंच झाल्यामुळे आनंद व्यक्त करत तरुणांनी राजकारणात येण्याचे आव्हान देखील करण्यात आले. यावेळी नवनिर्वाचित उपसरपंच मनोज कुंभारकर यांच्या वरती शुभेच्छांचा वर्षाव करत गावातून वाजत गाजत मिरवणूक देखील काढण्यात आली. गावातील सर्व ग्रामस्थांनी या मिरवणुकीत उपस्थिती होते. यावेळी प्रमुखउपस्थिती शिवसेना (उबाठा)चे जिल्हाप्रमुख दिपक निकम, शिवसेना (उबाठा) उपजिल्हाप्रमुख रामदास पाटील, उपजिल्हा प्रमुख भरत पाटील, महानगरप्रमुख समाधान काशीद, तालुका प्रमुख संदीप तांडेल, मा. तालुकाप्रमुख विश्वास पेटकर,उपतालुकाप्रमुख शांताराम कुंभारकर,दत्तात्रेय फडके विभागप्रमुख, संदीप पाटील सरपंच नितलस, विभाग प्रमुख प्रमोद पाटील, विष्णू भोईर उपविभाग प्रमुख, जगन्नाथ म्हात्रे शाखाप्रमुख मोर्बे, शाखा प्रमुख किशोर काकडे हे उपस्थितीत आदी सह ग्रामस्थ बंधू आणि महिला भगिनी यांनी उपस्थित राहून मनोज कुंभारकर यांच्या वरती शुभेच्छा वर्षाव केला.

## साकोली येथे फिनिक्स करियर अकॅडमी गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे भंडारा-** फिनिक्स करियर अँकॅडमी, साकोली यांच्या वतीने पोलीस भरतीमध्ये निवड झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमात निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करण्यात आले.



या कार्यक्रमाचे आयोजन संस्थापक सौ.संगमा आशिष वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून श्री. मा.शिवमजी इसापुरे सर (DYSP, साकोली) उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मेहनत, शिस्त आणि सातत्य यांच्या जोरावर यश प्राप्त करता येते असे सांगितले.

कार्यक्रमाला संदीपजी कदम तहसीलदार साकोली , चिंतामणजी थेर (माजी गट शिक्षण अधिकारी तथा अध्यक्ष झाडे कुणबी समाज),.हेमराजजी हेमने (माजी मुख्याध्यापक), वामनजी वैद्य (माजी मुख्याध्यापक),पौर्णिमा वैद्य,. शुभांगी कोदाने , सतीश उके BARTI,SARATHI,TR-TI, मॅनेजर भंडारा तसेच रवीजी लिचडे संस्थापक स्वप्नपूर्ती करिअर अकॅडमी लाखनी, रजत राऊत संचालक सावित्रीबाई फुले वाचनालय पहेला या सर्व मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत सत्कार सोहळा समारंभ पार पडला तसेच ,मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून भविष्यातही विविध स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळविण्यासाठी प्रेरणा दिली. कार्यक्रमात विद्यार्थ्यांसह पालकांचीही मोठ्या संख्येने उपस्थिती होती.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रोहित थेर यांनी केले तर आभार प्रदर्शन रोहित खोटेले यांनी मानले. संपूर्ण कार्यक्रम उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात पार पडला.

## मुरुड शहरातील रस्त्यांवर अतिक्रमणाचा विळखा; नागरिकांकडून प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

**दैनिक युवक आधार**

**लातूर ग्रामीण मोहम्मद पिंजारी** : मुरुड शहरातील मुख्य तसेच अंतर्गत रस्त्यांच्या कडेला पत्र्याचे डबे, विविध साहित्य व तात्पुरत्या संरचना उभारून अतिक्रमण करण्यात आल्याचे चित्र अनेक भागांत दिसून येत आहे. यामुळे रस्त्यांची रुंदी कमी होत असून वाहतूक कोंडीसह पादचाऱ्यांनाही मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, सार्वजनिक रस्त्यांच्या कडेला मोठ्या प्रमाणात पत्र्याचे डबे व इतर साहित्य ठेवण्यात आल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे. काही ठिकाणी व्यापारी संकुलांमध्ये ये-जा करण्यासाठी राखीव ठेवलेल्या जागांवरही अतिक्रमण करून दुकाने उभारण्यात आल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे व्यापारी, ग्राहक तसेच नागरिकांना संकुलात प्रवेश करताना अडचणींचा सामना करावा लागत असल्याची तक्रार आहे.

नागरिकांचे म्हणणे आहे की, या अतिक्रमणांबाबत संबंधित प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करण्यात आल्या आहेत. मात्र, अद्याप प्रभावी कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. काही ठिकाणी नियमांचे उल्लंघन होत असतानाही त्याकडे दुर्लक्ष केले जात असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. त्यामुळे अतिक्रमण हटविण्याबाबत प्रशासनाची भूमिका प्रश्नचिन्हाखाली आली असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

दरम्यान, रस्त्यांच्या कडेला वाढलेल्या अतिक्रमणांमुळे वाहतुकीचा प्रश्न गंभीर बनत चालला असून अपघाताचा धोकाही वाढत असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे. सार्वजनिक वापरासाठी राखीव असलेल्या जागा मूळ उद्देशासाठी खुल्या ठेवून सर्व अतिक्रमणांची निष्पक्ष चौकशी करावी, तसेच नियमांनुसार तातडीने कारवाई करून रस्ते व प्रवेशमार्ग मोकळे करावेत, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

शहरातील सार्वजनिक रस्ते आणि व्यापारी संकुलांच्या प्रवेशमार्गांवरील अतिक्रमण हटविण्यासाठी प्रशासन नेमकी कोणती पावले उचलणार, याकडे आता मुरुडकरांचे लक्ष लागले आहे.

## नवीन पनवेल सूर्या हॉटेल समोरील टु व्हिलर पार्किंग वाहनावर पोलीसांची कारवाई

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** नवीन पनवेल जनता मार्केट, सेक्टर 18, सूर्या हॉटेल समोर रेल्वेहुन मुंबई ला नोकरीसाठी जाणारे आपल्या टु व्हिलर गाड्या पार्क होते त्यांचा नाहक त्रास मार्केट चे दुकानदार आणी ग्राहक यांना होतो.

कित्येक वेळा या गाड्या इतक्या खेटून लावल्या असतात की ग्राहकांना येणे जाणे शक्य होत नव्हते तसेच ज्येष्ठ नागरिकांना येणे जाणे शक्य नव्हते या त्रासाचा विचार करून जनता मार्केट व्यापारी संघटने तर्फे वाहतूक पोलीस शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक आदुंबर पाटील यांना हा त्रास सांगितलं असता त्यांनी त्यांच्या सहकार्यासोबत घेऊन या गाड्या टोईंग करून कारवाई केली. यावेळी वाहतूक शाखेचे महेंद्रसिंह राजपुत,





पो.नाईक-केशव निकम,,पो.शिपाई महेंद्र गळव,पो हवा अमीर मुलाणी, पो शि सुरेश जौंजाळ यांनी सर्व गाडयांवर कारवाई करण्यात आली. आणि येथील रस्त्याला व जनता मार्केट ग्राहकांच्या गाड्या लावण्यासाठी मोकळा केल्याने जनता मार्केट व्यापारी असोसिएशन च्याकडून वाहतूक पोलीस अधिकारी औदुंबर पाटील आणि वाहतूक टीमचे आभार मानले.

## जात निहाय जनगणना 2026/ 27 ला पहेला ग्रामपंचायत चा विरोध ; जिल्हाधिकारी यांना निवेदन सादर

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे भंडारा-** तालुक्यातील पहेला येथील ग्रामपंचायत ने 2026/ 27 ला होणाऱ्या जातनिहाय जनगणनेला पहेला व श्रीनगर गावातील ग्रामस्थांनी ओबीसी,एन टी , एसबीसी चा जातनिहाय जनगणनेच्या भारतीय राजपत्रामध्ये स्वतंत्र कालम नसल्यामुळे व त्यांची अन्य मध्ये गणना असल्यामुळे व हे नेमके अन्य कोण असा प्रश्न निर्माण होतो? या देशात




या समाजाची लोकसंख्या किती आहे हे कसे कळेल ! भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानाने घटनेमध्ये 52 टक्के ओबीसींना आरक्षण दिलेले आहे. परंतु या समाजाची जनगणना झाली नाही शिक्षणातील आरक्षण, नोकरीतील आरक्षण, राजकारणातील आरक्षण, यावर गंभीर परिणाम होणार आहे. त्यामुळे ओबीसी समाज विकासापासून कोसो दूर जाणार आहे. ओबीसी समाजाच्या घरातील कुत्रे ,मांजर, डुकरे , गाई, म्हशी,या सर्वांची गणना होते ,घरांची सुद्धा गणना होते मग माणसाची का नाही! केंद्र सरकारचे षडयंत्र तर नाही ?. ओबीसी म्हणजे नेमके कोण !असा प्रश्न ओबीसी , व्ही जे एन टी, एसबीसी यांनी उपस्थित केला असून जोपर्यंत जात निहाय जनगणनेत ओबीसी समाजाचा स्वतंत्र कालम राहणार नाही तोपर्यंत जनगणना होऊ देणार नाही असा निर्णय पहेला येथे सर्वसाधारण गाव सभेत 19 मे 2026 च्या झालेल्या सभेत ठरविण्यात आले.

## दर्यापूर पोस्ट ऑफिसच्या इमारतीची खासदार बळवंत वानखडे यांनी केली आकस्मिक पाहणी

**दैनिक युवक आधार**

**दर्यापूर ज्ञानेश्वर काळे तालुका प्रतिनिधी** : दर्यापूर, २१ मे–दर्यापूर शहरातील पोस्ट ऑफिसच्या जीर्ण झालेल्या इमारतीकडे लक्ष द्यावे अशी नागरिकांची मागणी होती. या पार्श्वभूमीवर अमरावती लोकसभा मतदारसंघाचे खासदार बळवंत वानखडे यांनी आज दर्यापूर पोस्ट ऑफिसला आकस्मिक भेट देऊन संपूर्ण इमारतीची सखोल पाहणी केली.दर्यापूर तालुक्यातील शहरात कार्यरत असलेल्या पोस्ट ऑफिसची इमारत अनेक ठिकाणी निर्णय झाली आहे. इमारतीच्या दुरवस्थेमुळे नागरिक व कर्मचाऱ्यांना अडचणी येत होत्या. या इमारतीच्या दुरुस्तीबाबत किंवा नवीन इमारत बांधण्याबाबत प्रशासनाने लक्ष द्यावे, अशी मागणी गेल्या काही दिवसांपासून स्थानिकांकडून होत होती.नागरिकांच्या मागणीची दखल घेत खा. वानखडे यांनी आज थेट पोस्ट ऑफिस गाठले. त्यांनी प्रत्येक विभागाची पाहणी करून पोस्टमास्तर श्री. संदीप गवई यांच्याशी चर्चा केली.



इमारतीच्या दुरुस्तीची फाईल कुठपर्यंत आली आहे, याची त्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क साधून माहिती घेतली.

पाहणीनंतर खा. वानखडे यांनी अमरावती येथे वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करून आजपर्यंत झालेल्या कारवाईची सर्व कागदपत्रे मागवली आहेत. तसेच पोस्ट ऑफिसशी संपर्क साधून या प्रकरणी पुढील कार्यवाही करण्याचे आदेश त्यांनी आपले असिस्टंट दीक्षांत पाटील यांना दिले. इमारतीचा प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावून नागरिकांना चांगली सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आपण प्रयत्नशील असल्याचे खा. वानखडे यांनी यावेळी सांगितले.

# "विष टाकून कांदळवन नष्ट ? स्थानिक म्हणतात राजकीय संरक्षणामुळे कारवाई नाही ; साळावमधील कांदळवन संकट"

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे रेवदंडा** : मुरुड तालुका, साळाव गावाजवळील शासकीय बंधाऱ्यामध्ये समुद्राचा नैसर्गिक भरती-ओहोटीचा मार्ग अवैधपणे बंद करून कांदळवन (मँग्रोव्ह) नष्ट करण्याचा मोठा प्रकार उघड, स्थानिकांचा आरोप प्रशासकीय गळती आणि राजकीय संरक्षणामुळे कारवाई नाही.रायगड जिल्ह्यातील मुरुड तालुक्यातील साळाव गावाजवळील शासकीय बंधारा परिसरात सुमारे चार किलोमीटरपर्यंत आहे असा नैसर्गिक भरती-ओहोटीचा जलप्रवाह काही समाजकंटकांनी (कंपनी)दोन वर्षांपासून अवरुद्ध केला असून अलीकडे तीन महिन्यांपासून ही कारवाई तीव्र झाली आहे. स्थानिक रहिवासी नौशाद हुसेन गोरमे यांच्या तक्रारीनुसार बंधाऱ्यावरचे दरवाजे दगड लावून बंद करण्यात आले आहेत; परिणामी कांदळवनाला (मँग्रोव्ह) पाण्याचा पुरवठा थांबला असून झाडे कोरडी पडून नष्ट होत आहेत.स्थानिक म्हणतात की कांदळवन केवळ पर्यावरणासाठी नाही तर स्थानिक उपजीविकेसाठीही जीवनरेखा आहे पावसाळ्यात मासेमारी बंद असताना खेकडे, शिंपले यावर आधारित अन्ननिर्भरता आणि रोजगार यावर थेट परिणाम होतो. तसेच कांदळवन किनाऱ्याची धूप, पूर-वादळ व सुनामीपासून संरक्षण करते; एका झाडाचे मूळ दहा हजारांपर्यंत मोलाचे असते आणि अनेक प्रजाती या कोकणात नैसर्गिकरित्या आढळतात.



**जागरूककरांचा आरोप विषविष्कार आणि कंपनीचा सहभाग**

स्थानिकांनी आरोप केला आहे की काही लोक नियमितपणे कांदळवनावर विषारी औषधे टाकत आहेत; यासाठी एका कंपनीची बोलेरो गाडी वारंवार येते आणि त्यातील लोक झाडांवर विषाचे फोटो-व्हिडिओ काढण्याचा प्रयत्न करतात. या प्रकारामुळे माशांचे प्रजनन बाधित होण्याची शक्यता आहे; मुरुड खाडीतील जैवविविधतेला गंभीर धक्का लागणार असल्याचे स्थानिक सांगतात.

**कायदेशीर चौकट आणि प्रशासकीय निष्क्रियतेवर प्रश्न**

महाराष्ट्र शासनाचे कांदळवन संरक्षण धोरण (२०१८), महाराष्ट्र वन (संरक्षण) अधिनियम १९८० आणि CRZ अधिसूचना २०१९ यांच्या अनुषंगाने हा प्रकार दंडनीय आहे.रायगड जिल्ह्यातील ४,४११ हेक्टर कांदळवन संरक्षणाबाबत उच्च न्यायालयाने निर्देश दिलेले असूनही, स्थानिक तक्रारींवर जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्याकडे लेखी तक्रार असूनही अपेक्षित कारवाई का होत नाही असा कठोर प्रश्न समाजात पडला आहे.

स्थानिकांचा आरोप आहे की कोकण कांदळवन कक्ष , अलिबाग कांदळवन वन अधिकारी आणि अन्य विभाग दबावाखाली काम करत आहेत किंवा निष्क्रिय आहेत; उदाहरण काही ठिकाणी (रेवदंडा बायपास) कांदळवन कत्तल करून अवैध बांधकामाला शासनाने परवानगी दिल्याचेही त्यांनी नमूद केले.

**स्थानिक मागण्या व कायदेशीर पावले**

तातडीची स्वतंत्र आणि पारदर्शक चौकशी; अवैध दगड आणि अडथळे हटवून भरती-ओहोटीचा मार्ग त्वरित पूर्ववत करावा.विषारी द्रव्ये वापरणाऱ्या व अवैध तोडफोड करणाऱ्या व्यक्तींविरुद कांदळवन वनविभाग, प्रदूषण नियंत्रण मंडळ व पोलीस यांच्याकडे अजामीनपात्र गुन्हा नोंदवावा (संदर्भार्थ IPC कलम ४२६, ४२७ तसेच पर्यावरणीय नुकसानाशी संबंधित कलमे).

ग्रामपंचायतीने त्वरित पत्रव्यवहार करून केंद्र/राज्य शासन, वनविभाग व कोकण कांदळवन कक्षाला अहवाल पाठवावा; भविष्यातील प्रतिबंधासाठी नियमित तपासणी व निरीक्षण ठरवावे.

**लोकांच्या रागाचा शेवट पर्यंत आवाज**

नौशाद गोरमे म्हणतात, "आपल्या कानाकोपऱ्यांपर्यंत पोहोचणारी ही विडंबना — शासनाचे कायदे असताना सरकारी बंधाऱ्यावर लोक स्वतः धारणा करून आपल्या जमिनी व समुद्री परिसंस्था नष्ट करीत आहेत;

आम्ही जर आता रोखून न दिले तर आमची पिढी आणि आपला किनारा दोन्ही नष्ट होतील." स्थानिकांनी चेतावणी दिली आहे की प्रशासनाने नीट कारवाई केली नाही तर ते केंद्र सरकार, राज्य सरकार आणि न्यायालयापर्यंतही न्याय याचिकेत जाणार आहेत.

# मुदखेड तालुका भाजपा युवामोर्चाच्या उपाध्यक्षपदी माधव पाटील वसुरे यांची निवड

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी:- प्रकाश गवारे** : मुदखेड तालुक्यातील मेंडका येथील भारतीय जनता पक्षाचे कट्टर व एकनिष्ठ कार्यकर्ते माधव मारोती पाटील वसुरे यांची भारतीय जनता पक्ष युवा मोर्चाच्या मुदखेड तालुका उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीमुळे मेंडका गावासह संपूर्ण मुदखेड तालुक्यात भाजप कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा राज्यसभेचे खासदार अशोकराव चव्हाण भोकर विधानसभा मतदारसंघाच्या आमदार श्रिजया चव्हाण तसेच भाजप जिल्हाध्यक्ष किशोर देशमुख यांच्या हस्ते ही नियुक्ती जाहीर करण्यात आली.



माधव पाटील वसुरे यांनी पक्ष संघटनेसाठी केलेले सातत्यपूर्ण कार्य, पक्षनिष्ठा आणि युवा कार्यकर्त्यांमध्ये असलेली सक्रियता लक्षात घेऊन त्यांच्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. त्यांच्या निवडीमुळे भाजप युवा मोर्चाला तालुक्यात अधिक बळ मिळणार असल्याची भावना कार्यकर्त्यांनी व्यक्त केली.या निवडीबद्दल भाजप उत्तर महामंत्री बाळासाहेब देशमुख बारडकर, मुदखेड तालुकाध्यक्ष केशव पाटील मुंगल, नगराध्यक्ष माधव पाटील कदम, तालुकाध्यक्ष दत्तुभाऊ देशमुख, मारोती पाटील किरकान, भाजपा तालुका महामंत्री सचिन पाटील मगरे, भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष नरेंद्र दादा चव्हाण, भाजप युवा शहराध्यक्ष रामभाऊ आबादार तसेच तालुक्यातील सर्व भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी माधव पाटील वसुरे यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# शेतकऱ्यांना शेती मशागतीसाठी डिझेलचा राखीव साठा उपलब्ध करून द्या : एकनाथ हिवाळे

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : सिल्लोड तालुक्यात सध्या खरीप हंगामपूर्व शेतीकामांना वेग आला असून शेतकरी बांधव ट्रॅक्टरच्या माध्यमातून नांगरणी, वखरणी तसेच पेरणीपूर्व मशागतीची कामे करत आहेत. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना डिझेलची कमतरता भासू नये यासाठी तालुक्यातील पेट्रोल पंपांवर शेतकऱ्यांसाठी डिझेलचा स्वतंत्र साठा राखीव ठेवण्यात यावा तसेच कॅनमध्ये डिझेल उपलब्ध करून देण्याची




मागणी करण्यात आली आहे.

याबाबत भाजपचे तालुका अध्यक्ष श्री. एकनाथ रामदास हिवाळे (भवन मंडळ) यांनी तहसीलदार, सिल्लोड यांना निवेदन दिले आहे. अनेक वेळा ट्रॅक्टर पेट्रोल पंपावर आणणे शक्य नसल्याने शेतकऱ्यांना अतिरिक्त खर्च व वेळेचा सामना करावा लागतो. त्यामुळे शेतकऱ्यांची गैरसोय टाळण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करण्याची मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

महसूल व पुरवठा विभागामार्फत तालुक्यातील सर्व पेट्रोल पंप चालकांना योग्य त्या सूचना देऊन शेतीकामासाठी लागणारे डिझेल कॅनमध्ये उपलब्ध करून द्यावे, अशी विनंतीही निवेदनात करण्यात आली आहे.

या निवेदनामुळे शेतकरी बांधवांच्या डिझेल समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधले गेले असून लवकरच सकारात्मक निर्णय होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. यावेळी दिलीप पालोदे, ईश्वर कुंटे, अर्जुन सौंदर, विलास जरारे, विलास पालोदे उपस्थित होते.

# उभरते सितारेमध्ये ‘जागरूकता’

**दैनिक युवक आधार**

**राहुल मडावी नागपूर** : जीवनात प्रत्येक क्षणी सतर्क आणि जागरूक राहणे अत्यंत आवश्यक आहे. अन्यथा अनेक अडचणींचा सामना करावा लागू शकतो. छोट्या-छोट्या गोष्टींमधून आपण बरेच काही शिकू शकतो. जसे की, पाण्याची बचत करणे, झाडांचे संवर्धन करणे तसेच पशू-पक्ष्यांसाठी दाणे ठेवणे आवश्यक आहे. कारण आपल्या पृथ्वीच्या जीवनचक्रात हे सर्व एकमेकांचे पूरक आणि सहाय्यक आहेत. सध्याच्या परिस्थितीत मोठ्यांसह मुलांनीही समकालीन विषयांबरोबरच मोबाईलवरील आर्थिक व्यवहार करताना सावध राहणे, ओटीपी शेअर न करणे तसेच पासवर्डसंदर्भातील बाबींमध्ये अत्यंत काळजीपूर्वक वर्तन करणे गरजेचे आहे. लोकांशी आदराने आणि चांगल्या वर्तनाने वागणेही तितकेच महत्त्वाचे आहे. या बाबी सहसंयोजिका वैशाली मदारे यांनी मुलं



आणि त्यांच्या पालकांसमोर मांडल्या. यावेळी विनोद बाराहाते यांनी ग्रामीण स्वच्छता आणि वृक्षारोपणाचे महत्त्व सांगितले.

विदर्भ हिंदी साहित्य संमेलनाच्या नवोदित प्रतिभांना समर्पित ‘उभरते सितारे’ या उपक्रमाचे आयोजन हिंदी मोर भवनच्या उत्कर्ष हॉलमध्ये करण्यात आले. कार्यक्रमाचा विषय ‘जागरूकता’ हा असून, तो शैक्षणिक, ज्ञानवर्धक आणि संगीतमय सादरीकरणांनी परिपूर्ण होता. कार्यक्रमात विशेष अतिथी म्हणून आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, नागपूर येथील श्री. विनोद डोमाजी बाराहाते उपस्थित होते. त्यांचा सन्मान संयोजक युवराज चौधरी आणि सहसंयोजिका वैशाली मदारे यांनी स्वागत वस्त्र आणि स्मृतिचिन्ह देऊन केला.

त्यानंतर सर्व मुलांनीही ‘जागरूकता’ या विषयावर सुंदर विचार मांडत उत्कृष्ट नृत्य आणि गीतांचे सादरीकरण केले. यामध्ये संपूर्णा रेमंडल, मनश्री कुर्वे, पहल बनसोड आणि आराध्या मोहतुरे यांनी आपल्या नृत्याने सर्वांची मने जिंकली. विधी कृपलानी, प्रियांशी फुलझेले, त्रिशिका वाघमारे, आदित मिंज आणि सुतिक्ष रामटेके यांनी सुंदर गीतांचे सादरीकरण केले. शाश्वत गजभिए यांनी कीबोर्ड वादन केले, तर नक्श रिझवानी यांनी लघुकथा सादर केली.

मुलांच्या सादरीकरणाचे त्यांच्या पालकांसह मोनिका रेमंडल, संध्या सेठी, निलिमा बाराहाते, गीता सुरेश मिंज, जवाहर तरार, सीमा लूहा, शिवानी लूहा, स्नेहा रामटेके, पालिका बागडे, शशीकांत फुलझेले, कशिश रिजवानी, आशा विजय भगत, दीपक कृपलानी आणि स्पंदन रेमंडल आदींनी भरभरून कौतुक केले. कार्यक्रमाचे प्रभावी संचालन सहसंयोजिका वैशाली मदारे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रशांत शंभरकर यांनी सहकार्य केले. तसेच उपस्थित सर्व प्रेक्षक, कलाकार आणि मुलांचे आभार संयोजक युवराज चौधरी यांनी मानले.

# खाडपोली शाळेत 'खा-खेळा-वाचा' जनजागृती अभियानाद्वारे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी** : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खाडपोली क्रमांक-१ येथे ईपीआर फाऊंडेशनच्या वतीने आणि संस्थेच्या संस्थापिका अपर्णा शहा यांच्या संकल्पनेतून खा-खेळा-वाचा या जनजागृती अभियानांतर्गत सदिच्छा भेट व मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.भारताला एक निरोगी आणि आनंदी राष्ट्र बनवण्याच्या ध्येयाने हे अभियान राबवले जात आहे. विद्यार्थ्यांना शालेय जीवनापासूनच आरोग्य आणि ज्ञानाचे महत्त्व समजावे, या हेतूने खालील त्रिसूत्रीवर मार्गदर्शन करण्यात आले. योग्य आणि सकस आहाराचे महत्त्व, शारीरिक व्यायामाचे आणि खेळाचे जीवनातील महत्व समजवण्यात



आले. वाचनाची आवड निर्माण करून ज्ञानाची व्याप्ती वाढवणे. हा कार्यक्रम केवळ व्याख्यान स्वरूपात न राहता, तो अत्यंत रंजक पद्धतीने पार पडला. यामध्ये विविध कलाकृती आणि छोट्या नाटिकांच्या माध्यमातून आरोग्य व शिक्षणाचे महत्त्व विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवण्यात आले. हसत-खेळत दिलेल्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांनी विषयाचे गांभीर्य आनंदाने स्वीकारले. शाळेतील विद्यार्थ्यांनी सर्व उपक्रमांमध्ये अत्यंत उत्साहाने सहभाग नोंदवत कार्यक्रमाचा आनंद लुटला. विद्यार्थ्यांनी बालपणापासूनच सकस आहार, नियमित खेळ आणि वाचनाची गोडी लावून घेतल्यास भारताचे भविष्य नक्कीच उज्ज्वल आणि निरोगी होईल. या उपक्रमाबद्दल शाळा व्यवस्थापन समिती आणि पालकांनी संस्थेचे व अपर्णा शहा यांचे आभार मानले.

# पावसाळ्यात रोजगाराचा प्रश्न गंभीर; स्थानिक युवकांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी - अनिकेत मोहित** : श्रीवर्धन - कोकणातील किनारी भागात पावसाळा सुरू होताच अनेक पारंपरिक व्यवसाय पूर्णपणे बंद पडतात. मासेमारी, पर्यटन, बांधकाम तसेच इतर हंगामी व्यवसाय ठप्प होत असल्याने स्थानिक युवक आणि कुटुंबांसमोर चार महिन्यांचा रोजगाराचा मोठा प्रश्न निर्माण होतो. दरवर्षी हीच परिस्थिती निर्माण होत असतानाही स्थानिक पातळीवर ठोस रोजगार निर्मितीसाठी कोणतीही प्रभावी पावले उचलली जात नसल्याची नाराजी नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून स्थानिक युवकांकडून रोजगार संधी निर्माण करण्याची मागणी केली जात आहे. औद्योगिक प्रकल्प, लघुउद्योग, पर्यटनाशी संबंधित व्यवसाय, प्रक्रिया उद्योग तसेच हंगामी रोजगार उपलब्ध करून देण्याबाबत सातत्याने मागण्या होत आहेत. मात्र, या प्रश्नाकडे कोणताही राजकीय पुढारी किंवा स्थानिक नेतृत्व गांभीर्याने पाहत नसल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

विशेषतः पावसाळ्यात अनेक कुटुंबांचे उत्पन्न पूर्णपणे बंद होते. त्यामुळे अनेक युवकांना रोजगारासाठी शहरांकडे स्थलांतर करावे लागते, तर काही जण बेरोजगारीमुळे आर्थिक अडचणीत सापडतात. स्थानिक स्तरावर कायमस्वरूपी रोजगाराच्या संधी निर्माण झाल्यास युवकांना आपल्या गावातच रोजगार मिळू शकतो, असे मत व्यक्त होत आहे.

दरवर्षी निवडणुकांच्या काळात रोजगाराचे आश्वासन दिले जाते; मात्र प्रत्यक्षात युवकांच्या हाताला काम मिळण्यासाठी कोणतीही ठोस योजना राबवली जात नसल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. आता तरी स्थानिक लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाने या गंभीर प्रश्नाकडे लक्ष देऊन युवकांसाठी रोजगारनिर्मितीचे ठोस धोरण राबवावे, अशी मागणी होत आहे.

# सत्ताधाऱ्यांचाच ‘आक्रोश’ की समाजात तेढ निर्माण करण्याचा डाव? बीडच्या रणरागिणी माधुरी घुमरे यांचा आमदारांवर घणाघात!

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा(प्रतिनिधी)** - राज्यातील सत्ताधारी नेतेच मोर्चे काढून सर्वसामान्य जनतेला वेठीस धरत असल्याचा आरोप आता उघडपणे होऊ लागला असून मुंबईत एका रणरागिणीने थेट मंत्री गिरीश महाजन यांना “गेट आउट” म्हणत संताप व्यक्त केल्याची घटना संपूर्ण देशाने पाहिली. त्यानंतर आता बीड जिल्ह्यातूनही अशाच प्रकारे सत्ताधाऱ्यांविरोधात आवाज उठू लागला असून सामाजिक कार्यकर्त्या माधुरीताई घुमरे यांनी हिंदू जन आक्रोश मोर्चाच्या नावाखाली मुस्लिम समाजाला टार्गेट केल्याचा गंभीर आरोप करत सत्ताधारी आमदारांनाच फैलावर घेतले आहे. दि.१८ मे सोमवार रोजी बीड जिल्ह्यातील नेकनुर येथे आमदार संग्राम जगताप व महेश लांडगे यांच्या प्रमुख उपस्थितीत “हिंदू जन आक्रोश मोर्चा” आयोजित करण्यात आला होता. या मोर्चानंतर सोशल मीडियावर एक व्हिडिओ मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला असून त्यात माधुरी ताई घुमरे यांनी थेट सत्ताधारी आमदारांवर सडकून टीका केली आहे. “आ.संग्राम जगताप व आ. महेश लांडगे आपण लोकप्रतिनिधी आहात. जनतेने आपल्याला निवडून दिलं ते प्रश्न सोडवण्यासाठी, समाजात आग लावण्यासाठी नाही,” अशा शब्दांत माधुरी ताईंनी संताप व्यक्त केला. “महाराष्ट्रातील बहुजन हिंदू-मुस्लिम समाजात कधीच वैमनस्य नव्हतं. १९९२ मध्ये बाबरी मशिद प्रकरणानंतर देशभर दंगली उसळल्या, पण महाराष्ट्रातील अनेक गावांमध्ये हिंदू-मुस्लिम ऐक्य कायम राहिलं. याच मातीत एकोप्याची परंपरा आहे,” असेही त्या म्हणाल्या. या वेळी त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज, राजमाता जिजाऊ,




शाहू-फुले-आंबेडकर यांच्या विचारांचा दाखला देत सत्ताधाऱ्यांवर निशाणा साधला. “जिजाऊंनी शत्रूच्या मृत्यूनंतरही सन्मानाने मुठमाती द्यायला शिकवलं, पण आज काही लोकप्रतिनिधी स्टेजवरून अपशब्द वापरत समाजात विष पेरत आहेत. शिव, शाहू, फुले, आंबेडकरांचे नाव घेऊन द्वेषाची भाषा करणं ही महाराष्ट्राच्या संस्कृतीची बदनामी आहे,” असा घणाघात त्यांनी केला. मुस्लिम समाजावर आर्थिक बहिष्कार टाकण्याच्या वक्तव्यावरूनही त्यांनी संतप्त प्रतिक्रिया दिली. “कोणत्याही समाजाची आर्थिक नाकेबंदी करण्याचा अधिकार तुम्हाला कोणी दिला? संविधानाने असा अधिकार दिला आहे का? रोजच्या व्यवहारात हिंदू-मुस्लिम एकमेकांशी जोडलेले आहेत. समाजा-समाजात तेढ निर्माण करून राजकारण करणं बंद करा,” असे आवाहन त्यांनी केले.“लोकप्रतिनिधींनी शिक्षण, रोजगार, आरोग्य, महिलांवरील अत्याचार, शेतकरी प्रश्न यावर बोलावं. दोन समाजात द्वेष पसरवून मतांचं राजकारण करू नये,” असा थेट इशाराही माधुरी ताई घुमरे यांनी दिला आहे.या व्हिडिओनंतर बीड जिल्ह्यात राजकीय वातावरण तापले असून सोशल मीडियावर विविध प्रतिक्रिया उमटत आहेत.

# गोष्ट अभिमानाची; मुकुंद गावित यांची दहावीत गरुडझेप भरारी

## गाव व परिसरातुन कु. मुकुंद गावित यांचे अभिनंदन

**दैनिक युवक आधार**



**राजेंद्र टोपले, सुरगाणा** : वांगण सुळे गावातील आदिवासी कलावंत श्री. गणपत हरी गावित यांचा मुलगा कु.मुकुंद गणपत गावित माध्यमिक आश्रमशाळा डोल्हारा येथे इयत्ता दहावीच्या परीक्षेत अतिशय खडतर परिश्रम घेत तालुक्यात ९२.६० % गुण मिळवून यशस्वी शिखर पार केले आहे. तालुक्यात नावलौकीक केले आहे. ही आपल्या गावासाठी अभिमानास्पद बाब आहे.त्यामुळे गाव व परिसरातून त्यांचे कौतुक व अभिनंदन होत आहे. त्याचा आदर्श इतर विद्यार्थ्यांनी घ्यायला हवा असे उदाहरण देत कौतुक केले जाते आहे. त्यांचे १ ली ते ७ वी पर्यंतचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोटंबा येथे झाले. तेव्हा तेथील शिक्षकांनी त्यांच्यातील अभ्यासू वृत्ती,गुण ओळखून विशेष मार्गदर्शन केले व पुढील शिक्षण ८ वी ते १० वी डोल्हारा येथे माध्यमिक आश्रमशाळेतील शिक्षकांनी विशेष मार्गदर्शन केले. मुकुंद गावित यांची परिस्थिती अतिशय हलाखीची आहे .

आईचे मातृत्व हरवल्याने प्राथमिक शिक्षण कोटंबा येथे मामाच्या गावाला झाले. मामा , मामी व आजी यांनी शिक्षणासाठी खर्च करत विशेष परिश्रम घेतले आहेत व घेत आहेत त्याबद्दल त्यांचे गाव व परिसरातून विशेष आभार मानले जात आहे.

# स्टीलच्या मालाची चोरी

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : ९४ हजार ५०० रुपये किमतीच्या स्टीलच्या मालाची चोरी केल्याप्रकरणी कळंबोली पोलीस ठाण्यात आरोपी विरोधात पुन्हा दाखल करण्यात आला. ताराचंद इन्फ्रा लॉजिस्टिक सोल्युशन लिमिटेड या कंपनीकडून स्टील ऑथॉरिटी ऑफ इंडिया स्टील मार्केट कंपनी या कंपनीकडे येणाऱ्या स्टीलचा माल डिस्ट्रीब्यूशन करण्याचे काम चालते. स्टील ऑथॉरिटी ऑफ इंडिया या कंपनीच्या वजन काट्याचे कॉलीब्रेशन करण्यासाठी लागणारे 94 हजार 500 रुपयांचे बेचाळीस नग चोरांनी चोरून नेले.

# स्वत:च्या पायावर उभे राहता येईल अशा क्षेत्रात करिअर करा - युवा नेते रणवीर(काका)पंडित

## पाटोद्याच्या जय भवानीत गुणगौरव सोहळा व पालक मेळावा संपन्न

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी):** विद्यार्थ्यांनी स्वत:च्या पायावर उभे राहता येईल. अशा क्षेत्रात करिअर करा ! असे प्रतिपादन युवा नेते रणवीर (काका) पंडित यांनी केले. ते पाटोदा येथील जयभवानी महाविद्यालयात एच.एस.सी. परीक्षेत उत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या गुणगौरव सोहळा व पालक मेळाव्यात ते प्रमुख पाहुणे म्हणुन बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले की भविष्यात कौशल्य विकासावर भर द्यावा! असे सांगुन सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुन भविष्यासाठी शुभेच्छा! दिल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे हे होते तर व्यासपीठावर मार्गदर्शक प्राचार्य डॉ.विश्वास कदम हे होते तर प्रमुख उपस्थीती म्हणुन विकास समिती सदस्य, दिलीपराव जाधव, कनिष्ठ विभागाचे प्रमुख प्रा.



प्रकाश नाईकवाडे हे व्यासपीठावर उपस्थित होते. प्रारंभी प्रस्ताविक करताना मार्गदर्शक प्राचार्य डॉ.प्राचार्य विश्वास कदम यांनी सांगितले की पाटोदा सारख्या ग्रामीण भागातील सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक करुन प्रेरणा मिळावी या हेतुने पालकांचा ही सन्मान करणे हे महाविद्यालयाचे कर्तव्य ठरते म्हणुन या गुण गौरव सोहळा व पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात येणार आहे असे सांगितले. या कार्यक्रमात सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा मान्यवरांचा शुभहस्ते गुणवंत विद्यार्थी व पालक यांचा गौरव करण्यात आला. विविध क्षेत्रात चांगली कामगीरी करणारे आदर्श विद्यार्थी, क्रिडा व विविध क्षेत्रात यशस्वी विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या शुभहस्ते गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाचे संचलन प्रा. डॉ.अशोक देवगुडे यांनी केले. तर आभार कनिष्ठ विभागाचे प्रमुख प्रा. प्रकाश नाईकवाडे यांनी मानले. या प्रसंगी जाधव सार्थक, देशमुख रोहन, भुसणार बापू, चौरे दत्तात्रय, जनक मकाळ, युवराज मळेकर, केशव मकाळ, भुसणार दत्तात्रय, सुरेश श्रीराम, केशव तांबे, नारायण गवळी, वाळेकर सुदाम, गिरगुणे बाजीराव, सुरेश भोजणे, सतिश लवांडे सह आदि बहुसंख्य पालक, सर्व प्राध्यापक वृंद, व गुणवंत विद्यार्थी उपस्थित होते. या संपूर्ण कार्यक्रमाचे फेसबुक लाईव्ह प्रेक्षपण नाटककार प्रा. बापू घोक्षे, व प्रा.डॉ.प्रविण शिलेदार यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठ अधिसभा सदस्या प्रा.डॉ.कल्पना घारगे, ग्रंथपाल श्रीमती ज्योती रकटे, प्रा. डॉ.बंडू लोखंडे, प्रा.डॉ.रामकृष्ण प्रधान, प्रा.सतिश जरांगे, प्रा.केशव सुर्वे, जोशी, प्रा.शिवाजी भोरे, प्रा.खैसर शेख, प्रा. डॉ.गोविंद बामदळे, प्रा.बजरंग डिसले, श्री.कुणाल काळे, नामदेव पोटफाडे, दत्ता चादर, श्रीमती साळुबाई नाईकनवरे आदि सर्व प्राध्यापकांनी व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले.

## दुसरा विवाह करून ऐंशी लाखांची केली फसवणूक

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : पहिल्या पतीसोबत घटस्फोट झालेला नसताना देखील दुसरा विवाह करून 50 वर्षीय इसमाची 80 लाख 44 हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी पत्नी आणि तिच्या आईविरोधात खारघर पोलीस ठाण्यात 21 मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. यातील पन्नास वर्षीय इसम आर्किटेक्ट असून ते खारघर, सेक्टर 23 येथे राहतात. 2022 पासून एका महिलेने त्यांची दिशाभूल करून पहिल्या पतीपासून घटस्फोट झालेला नसताना देखील त्यांच्याशी दुसरा विवाह केला आणि त्यांच्याकडून 80 लाख 44 हजार 531 रुपये घेऊन आर्थिक फसवणूक केली.

# हिंद केसरी महेंद्र गायकवाड यांचा सणसरमध्ये जंगी सत्कार

**दैनिक युवक आधार**

**सणसर :- विकास क्षत्रिय** : युवा कुस्तीपटू तथा हिंद केसरी किताब विजेते महेंद्र गायकवाड यांचा इंदापूर तालुक्यातील सणसर येथे विश्व हिंदू परिषद तालुका अध्यक्ष बजरंग रायते व ग्रामस्थांच्या हस्ते फेटा व हार घालून यथोचित सत्कार करण्यात आला.यावेळी कुस्ती क्षेत्रातील ज्येष्ठ मार्गदर्शक वस्ताद गोविंद तात्या पवार तसेच उपमहाराष्ट्र केसरी मनिष रायते यांचादेखील सत्कार करण्यात आला.कार्यक्रमा वेळी गावातील अनेक मान्यवर



व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.यामध्ये मनोहर रायते,अमर जगताप,आदित्य रायते, दिग्विजय रायते,माऊली नलवडे,नवनाथ वाघमोडे, योगेश सावंत,सल्लाउदीन पठाण,पै.गणेश नलवडे, अमोल कोयले,कार्तिक देवकाते आदींचा समावेश होता. संपूर्ण कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला असून उपस्थितांनी महेंद्र गायकवाड यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# वंचित बहुजन आघाडीच्या वतीने बैलगाडा मोर्चा संदर्भात आढावा बैठकीचे आयोजन !!

**दैनिक युवक आधार**

**मंगेश इंगळे /अकोट प्रतिनिधी :** इंधन दरवाढ तसेच सत्ताधाऱ्यांच्या दुटप्पी भूमिका विरोधात वंचित बहुजन आघाडीच्या वतीने होणाऱ्या बैलगाडा मोर्चा संदर्भात दिनांक २१ मे. रोजी अकोट शहरातील शासकीय विश्राम व येथे आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष प्रमोद देंडवे व महासचिव मिलिंद इंगळे यांच्या प्रमुख उपस्थितीत अकोट तालुका व शहराच्या वतीने अकोला येथे पार पडणाऱ्या बैलगाडा मोठ्या संदर्भात शासकीय विश्रामगृह येथे नियोजन बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.त्यावेळी वंचित बहुजन आघाडी, युवक आघाडी, महिला आघाडी, सम्यक विद्यार्थी आंदोलन, विव्दत सभा, भारतीय बौद्ध महासभा, आजी-माजी पदाधिकारी



व कार्यकर्ते सर्वांनी बैलगाडा मोर्चा संदर्भात आपापले विचार सविस्तरपणे मांडले. प्रामुख्याने उपस्थित असलेले जिल्हाध्यक्ष प्रमोद देंडवे व महासचिव मिलिंद इंगळे व तसेच युवक आघाडीचे महासचिव राजकुमार दामोदर यांनी महत्वपूर्ण मार्गदर्शन करताना मोर्चा संदर्भात कशाप्रकारे आयोजन करायचे आहे त्याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. आढावा बैठकीमध्ये वंचित बहुजन तालुकाध्यक्ष चरण इंगळे व महासचिव रोशन पुंडकर संघटक सुरेंद्र ओइबे,निलेश झाडे प्रसिद्धीप्रमुख स्वप्निल सरकटे,महिला तालुकाध्यक्ष सुनिता हिरोळे,शहर अध्यक्षा लताताई कांबळे,सुरेश गवई, युवक अध्यक्ष आशिष रायबोले,युवक महासचिव अमन गवई ,गोपाल ढोरे,संजय पुंडकर, लखन इंगळे,रामकृष्ण मिसाळ विक्की तेलगोटे दिपक तेलगोटे नितीन तेलगोटे प्रतीक तेलगोटे नवनीत तेलगोटे सुगत तेलगोटे रोशन सोनोने आदित्य तेलगोटे गजानन सोळंके अर्पण आठवले रोहित धांडे, दिनेश धांडे, भाऊराव धांडे, राजु भटकर, प्रमराज भटकर, निखिल गावंडे, नितीन वानखडे,सभा थोरात,,केशव बिलबिले,तुषार पाचकोर, कल्पना भटकर, संदिप सिरसाट, नितीन पळसपगार, यांच्यासह वंचित बहुजन आघाडीचे आजी माजी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.त्यावेळी सुत्रसंचालन रोशन पुंडकर यांनी केले तर आभार प्रदर्शन संदिप सिरसाट व स्वप्निल सरकटे यांनी केले.

# एक तास उशिराने सुटली ‘चिखली-लातूर’ बस; प्रवाशांचे प्रचंड हाल“

**दैनिक युवक आधार**

**बुलढाणा सिद्धार्थ धंदरे जिल्हा प्रतिनिधी** : (बुलढाणा)चिखली येथून सकाळी सात वाजता लातूरकडे जाणारी एसटी बस तब्बल एक तास उशिराने सुटल्याने प्रवाशांमध्ये संतापाची लाट उसळली. आधीच उन्हाचा तडाखा, त्यात वेळेवर गंतव्यस्थानी पोहोचण्याची घाई असलेल्या प्रवाशांना बसस्थानकावर ताटकळत उभे राहावे लागले. या संपूर्ण प्रकारामुळे प्रवाशांचे अक्षरशः अतोनात हाल झाले.

दरम्यान, बस उशिराने का सुटत आहे याबाबत प्रवाशांनी चौकशी कक्षावर विचारणा केली असता तेथील कर्मचाऱ्यांनी “वाहकाची तब्येत अचानक बिघडली असून घरून निघतानाच त्यांना अस्वस्थ वाटू लागले” असे उत्तर दिले. मात्र, या कारणामुळे तब्बल तासभर बस रोखून ठेवणे कितपत योग्य आहे, असा सवाल संतप्त प्रवाशांकडून उपस्थित केला जात आहे.दररोज प्रवास करणारे नोकरदार, विद्यार्थी, व्यापारी तसेच रुग्णालयात जाणारे नागरिक या बसवर अवलंबून असतात. काही प्रवाशांच्या महत्त्वाच्या भेटी चुकल्या, तर काहींना पुढील बस किंवा रेल्वे पकडण्यात अडचणी निर्माण झाल्या. “प्रवाशांच्या वेळेची किंमत एसटी प्रशासनाला आहे की नाही?” असा संतप्त सवाल यावेळी नागरिकांनी उपस्थित केला.



विशेष म्हणजे,बस उशिराने सुटणार असल्याची कोणतीही अधिकृत घोषणा करण्यात आली नाही. त्यामुळे प्रवासी संभ्रमातच बसस्थानकावर थांबून होते. वेळेवर पर्यायी व्यवस्था केली असती तर नागरिकांचा त्रास टाळता आला असता, अशी प्रतिक्रिया प्रवाशांनी दिली.एसटी महामंडळ हे सामान्य जनतेचे जीवनवाहन मानले जाते. मात्र अशा प्रकारच्या निष्काळजी कारभारामुळे ग्रामीण भागातील नागरिकांचा विश्वास डळमळीत होत असल्याचे चित्र आहे. एका कर्मचाऱ्याची तब्येत बिघडली असेल तर त्यासाठी पर्यायी कर्मचारी उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची जबाबदारी नाही का, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. प्रवाशांचा संतप्त सवाल “आम्हाला वेळेवर कामावर, शाळेत, दवाखान्यात पोहोचायचे असते. बस उशिराने सुटली तर त्याचा फटका आमच्या आयुष्यावर बसतो. आमच्या झालेल्या नुकसानीची जबाबदारी कोण घेणार?” असा संतप्त सवाल प्रवाशांनी उपस्थित केला आहे.

# कोकण विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल: रोबोटिक बोयो खऱ्या अर्थाने जीवनरक्षक ठरले

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे अलिबाग रेवदंडा प्रतिनिधी** : अलिबाग तालुक्यातील निसर्गसौंदर्याने ओरणाऱ्या नागाव बीचवर नुकताच समुद्रस्नान सुरक्षा आणि बचावकार्य अधिक सक्षम करण्यासाठी आयोजित केलेल्या ‘रोबोटिक बोयो’ या अत्याधुनिक जीवरक्षक यंत्रणाचे प्रात्यक्षिक विभागीय आयुक्त सौ. रुबल अग्रवाल यांच्या उपस्थितीत पार पडले. प्रात्यक्षिक पाहून विभागीय आयुक्तांनी या यंत्रणेच्या कार्यक्षमतेचे ऊल्लेखनीय कौतुक केले आणि “रोबोटिक बोयो खऱ्या अर्थाने जीवनरक्षक ठरत आहे” असा ठोस विश्वास व्यक्त केला.प्रात्यक्षिकावर नागावचे माजी सरपंच श्री. नंदकुमार मयेकर, सरपंच सौ. हर्षदा निखिल मयेकर, जिल्हा परिषद सदस्य डॉ. सचिन राऊळ, जिल्हाधिकारी किशन जावळे, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, उपजिल्हाधिकारी डॉ. रवींद्र शेळके,



तहसिलदार विक्रम पाटील, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सागर पाठक तसेच जिल्हाधिकारी कार्यालय व ग्रामपंचायताचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. उपस्थितांनी या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून समुद्रकाठच्या बचाव कार्यात अपेक्षित वाढ होईल, असे मत व्यक्त केले.

**कोकण विभागीय आयुक्तांचे निर्देश**

सौ. रुबल अग्रवाल यांनी प्रात्यक्षिकानंतर प्रशासनाला नागाव बीचवरील पर्यटकांसाठी उपलब्ध सुविधा अधिक सुसज्ज करण्याच्या अनेक सूचनाही केल्या. त्यांनी बीचवरील शौचालयांची संख्या आणि स्वच्छतेची व्यवस्था वाढवण्यावर भर दिला,

पर्यटकांच्या माहिती संकलनासाठी प्रभावी व्यवस्था राबविण्याबाबत मार्गदर्शन दिले,

आणि त्वरित बचावकर्म्यांची कार्यपद्धती व तंत्रज्ञानाच्या वापरावर सतत प्रशिक्षण ठेवण्याचे निर्देश दिले.

**सरपंचांचे नेतृत्व व ग्रामपंचायतीचे उपक्रम**

सरपंच सौ. हर्षदा मयेकर यांच्या नेतृत्वाखाली नागाव ग्रामपंचायत सातत्याने नाविन्यपूर्ण व लोककल्याणकारी उपक्रम राबवत असून, स्वच्छता, बीच सुरक्षा, पर्यावरण संरक्षण व आधुनिक सुविधांचा समतोल राखत नागावला आदर्श पर्यटनस्थळ बनवण्याचा प्रयत्न जोरात सुरू आहे. ग्रामपंचायतीने केलेल्या विविध प्रकल्पांमुळे स्थानिकांना रोजगारस्थिती मिळाली असून, नेत्यांच्या पक्षभेद नसलेल्या विकासविषयक दृष्टीकोनामुळे गावाचा समग्र उत्थान दिसून येत आहे.

**पर्यटन विकासात नवीन टप्पा**

‘रोबोटिक बोयो’ सारखे आधुनिक साधन नागावच्या पर्यटन विकासातील ऐतिहासिक पाऊल ठरणार आहे. प्रशासन आणि ग्रामपंचायत यांच्या समन्वयातून नगाव बीच भविष्यात राज्यातील सर्वात सुरक्षित आणि आकर्षक समुद्रकिनाऱ्यांपैकी एक म्हणून ओळख मिळवेल, असे स्थानिकांनी आश्वासन दिले. या यंत्रणेच्या यशस्वी वापरामुळे इतर ग्रामपंचायतींना देखील समुद्री सुरक्षा व पर्यटन वाढविण्यासाठी प्रेरणा मिळेल, असा विश्वास प्रबल आहे.

**नागावचा संदेश**

**नागा**वची ही पावले केवळ एका बीचच्या विकासापुरती मर्यादित नाहीत; ती छोट्या गावांनी नव्या तंत्रज्ञानाचा स्वीकार करून सुरक्षितता, स्वच्छता आणि रोजगारासह शाश्वत पर्यटन विकास कसा साध्य करता येईल याचे उदाहरण ठरतात. इतर ग्रामपंचायतींनीही या यशस्वी मॉडेलकडे लक्ष देऊन आपापल्या क्षेत्रात अशा उपक्रमांचे अंमलबजावणी करावी,हेच नागावने प्रेर्णा देण्याचे लक्ष्य आहे.

# मिरजगावात महानंदा गोशाळेचे उद्घाटन राजेंद्र गोरे यांचा स्तुत्य उपक्रम

**दैनिक युवक आधार**

**मिरजगाव सतीश शिंदे प्रतिनिधी** : श्री साई बालाजी प्रतिष्ठान मिरजगाव संचलित महानंदा गोशाळेचे उद्धाटन ह भ प सुदाम गोरखे गुरुजी यांच्या हस्ते करण्यात आले गो संवर्धनातून पर्यावरण संवर्धन आणि भारतीय संस्कृतीचे पाईक म्हणून गाईचे महत्व जपत समाज हिताचे कार्य उभे करण्याचा मी प्रयत्न करत आहे असे संस्थापक राजेंद्र गोरे यांनी सांगितले, या उद्धाटन सोहळ्यात मिरज गावचे माजी



सरपंच नितीन खेतमाळीस कर्जत कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक संपतराव जी बावडकर सर भावी पंचायत समिती सदस्य डॉक्टर पंढरीनाथ आबा गोरे, उपसरपंच लहू शेठ वतारे माजी सरपंच सारंग घोडेस्वार दादासाहेब बुद्धिवंत संजय खेडकर अंकुश मैत्री चंद्रकांत हुमे रामचंद्र मेहत्रे रमेश काळे संदीप केदारी दादासाहेब जवणे समितीचे अध्यक्ष सदाशिव जवणे उपाध्यक्ष बबनराव बनकर सदस्य देविदास कोल्हे रामदास माने कमलाकर बगाडे रामदास राहींज सरपंच जयदीप काळे रावसाहेब खिळे डॉक्टर श्रीराम धस आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते

संस्थापक राजेंद्र गोरे यांनी सांगितले गोरक्षण आणि गोपालन ही काळाची गरज असून सेंद्रिय शेतीसाठी गोपालनाशिवाय पर्याय नाही ग्रामीण भागातील शेतकरी पशुपालक आणि दानशूर व्यक्तींनी या उपक्रमास सहकार्य करावे असे आवाहन त्यांनी केले गोशाळेमुळे मिरजगाव आणि परिसरातील पशुपालनाला चालना मिळणार असल्याचे ह भ प राजेंद्र गोरे सर यांनी सांगितले, परिसरातील शेतकऱ्यांनी या गोशाळेस भेट देऊन माहिती जाणून घ्यावी असेही समितीच्या वतीने सांगण्यात आले,भक्तिमय वातावरणात हा दिमाखदार उद्धाटन सोहळा पार पडला.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॉक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# मा.विजय वाघमारे (भा.प्र.से) सचिव, आदिवासी विकास विभाग,यांची देवरी प्रकल्पास भेट

## देवरी प्रकल्पात राबविण्यात येत असलेल्या विविध योजना व उपक्रमाचे केलै कौतुक

**दैनिक युवक आधार**

**गोंदिया सचिन बन्सोड जिल्हा प्रतिनिधी** : दिनांक १४ मे,२०२६ रोजी मा.श्री. विजय वाघमारे (भा. प्र.से) सचिव, आदिवासी विकास विभाग, यांनी गोंदिया ता.देवरी प्रकल्प कार्यक्षेत्रामधील धमदीटोला येथे शबरी महामंडळ अंतर्गत गोंडाऊन बांधकाम ची पाहाणी करण्यात आले तसेच (FRMC) समिती सदस्या सोबत अडीअडचणीसंदर्भात चर्चा करण्यात आली,गणुटोला/कडीकसा येथील तेंदुपत्ता संकलन प्रक्रिया केंद्रास भेट, जिल्हा नियोजन समिती अंतर्गत चिचगड येथील आदिवासी सांस्कृतीमधील महत्वपुर्ण असे गोटूळ नुतनीकरणास भेट देवुन पाहाणी करण्यात आली तसेच, न्युक्लिस बजेट योजेअंतर्गत महिला बचत गटामार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध कामाची पाहाणी तसेच राणी दुर्गावती योजनेअंतर्गत विविध व्यवसाय लाभार्थी महिला सोबत संवाद साधण्यात आला. तसेच नरेगा विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या बांबू रोपवन, येथे भेट देवुन पाहणी करण्यात आली.

शासकिय कन्या आश्रमशाळा बोरगाव /बा येथे सुरु असलेल्या उन्हाळी शिबीर सहभागी २२५ विद्यार्थ्यासोबत भेट देवुन एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, देवरी अंतर्गत येणाऱ्या शासकीय आश्रम शाळांतील विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी शासकीय आश्रम शाळा, बोरगाव बाजार येथे उन्हाळी शिबिर २०२६ चे यशस्वी आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराला दिनांक १५ मे २०२६ रोजी मा.सचिव, महोदय, आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांनी सदिच्छा भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी शिबिरातील विविध प्रशिक्षण वर्गांची पाहणी करून विद्यार्थ्यांशी अतिशय मनमोकळा संवाद साधला.

मा. सचिव महोदयांनी शिबिरातील सांस्कृतिक विभागाला भेट दिली. या विभागात विद्यार्थ्यांना नृत्य, संगीत आणि ड्रामा (नाट्य) यांचे विशेष प्रशिक्षण दिले जात असल्याचे पाहणीदरम्यान महोदयांनी विद्यार्थ्यांचे सुरू असलेले नृत्याचे व संगीताचे सादरीकरण पाहिले. आदिवासी विद्यार्थ्यांच्या अंगी असलेली नैसर्गिक लय आणि कलेप्रती असलेली त्यांची आवड पाहून त्यांनी विशेष कौतुक केले. तसेच, ड्रामा वर्गातील विद्यार्थ्यांच्या अभिनय क्षमतेचे आणि त्यांच्यातील आत्मविश्वासाचे त्यांनी आवर्जून कौतुक केले व कलेच्या माध्यमातून स्वतःचा विकास कसा साधावा, याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यानंतर महोदयांनी चित्रकला आणि हस्तकला वर्गांची सविस्तर पाहणी केली. विद्यार्थ्यांनी रेखाटलेली हुबेहूब पोर्ट्रेट्स, आकर्षक रांगोळ्या, पेंटिंग आणि मेहंदीच्या डिझाईन्स पाहून त्यांनी विद्यार्थ्यांच्या सूक्ष्म कलाकुसरीची स्तुती केली. या विभागात बांबू प्रशिक्षण वर्गाला त्यांनी विशेष वेळ दिला. बांबूपासून बनवलेल्या विविध कलाकुसरीच्या वस्तू, गृहसजावटीचे साहित्य आणि दैनंदिन वापरातील वस्तूंचे निरीक्षण करून महोदयांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. या पारंपारिक कौशल्याला आधुनिकतेची जोड देऊन भविष्यात आर्थिक स्वावलंबनासाठी याचा




कसा उपयोग होऊ शकतो, यावर त्यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. खेळ आणि शारीरिक तंदुरुस्तीच्या उद्देशाने आयोजित अथलेटिक्स आणि मल्लखांब वर्गालाही महोदयांनी भेट दिली. आदिवासी विद्यार्थ्यांचा नैसर्गिक स्टॅमिना आणि चपळता अथलेटिक्सच्या प्रात्यक्षिकांमधून दिसून आली. तसेच, मल्लखांब या पारंपरिक आणि शारीरिकदृष्ट्या अत्यंत आव्हानात्मक खेळातील विद्यार्थ्यांची कसरत आणि शरीराचा तोल सांभाळण्याचे त्यांचे कसब पाहून महोदयांनी आश्चर्य आणि समाधान व्यक्त केले. या विद्यार्थ्यांनी भविष्यात राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर मल्लखांबमध्ये आपल्या प्रकल्पाचे नाव रोशन करावे, अशी सदिच्छा त्यांनी व्यक्त करून खेळाडूंचे मनोधैर्य वाढवले.

आधुनिक तंत्रज्ञान विभाग (एआय आणि रोबोटिक्स) या शिबिराचे सर्वात मोठे व नाविन्यपूर्ण आकर्षण असलेल्या 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) आणि रोबोटिक्स' प्रशिक्षण वर्गाला महोदयांनी दिलेली भेट अत्यंत लक्षवेधी ठरली. दुर्गम आणि आदिवासी भागातील विद्यार्थी रोबोटिक्सचे कोडिंग करत आहेत आणि एआय प्रणाली समजून घेत आहेत, हे चित्र पाहून मा. सचिव महोदयांनी अत्यंत आनंद व्यक्त केला. त्यांनी विद्यार्थ्यांनी तयार केलेले छोटे रोबोट्स आणि त्यांचे तंत्रज्ञान आधारित प्रकल्प पाहिले. एकविसाव्या शतकातील या अत्यंत प्रगत तंत्रज्ञानाशी आदिवासी विद्यार्थी यशस्वीपणे जोडले जात आहेत, हा आदिवासी विकास विभागाच्या वाटचालीतील एक मोठा व अभिमानास्पद टप्पा असल्याचे मत त्यांनी यावेळी नोंदवले.

विद्यार्थ्यांशी साधलेला मुक्त संवाद व मार्गदर्शन प्रत्येक विभागाला भेट दिल्यानंतर मा. सचिव महोदयांनी सर्व विद्यार्थ्यांशी एकत्रित संवाद साधला. हा संवाद विद्यार्थ्यांसाठी अत्यंत प्रेरणादायी ठरला. पारंपारिक ज्ञान आणि आधुनिक तंत्रज्ञान यांची सांगड घालूनच भविष्यातील प्रगती शक्य आहे, हा कानमंत्र त्यांनी दिला. उन्हाळी शिबिरात शिकलेल्या या सर्व गोष्टी केवळ छंदापुरत्या मर्यादित न ठेवता, भविष्यातील करिअरची दिशा ठरवण्यासाठी या कौशल्यांचा वापर करावा, असा मोलाचा सल्ला त्यांनी दिला.मा. सचिव महोदयांच्या या सदिच्छा भेटीमुळे व मार्गदर्शनामुळे शासकीय आश्रम शाळा, बोरगाव बाजार येथील उन्हाळी शिबिराला एक वेगळीच ऊर्जा प्राप्त झाली आहे. विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून, देवरी प्रकल्प स्तरावर राबविण्यात येत असलेल्या या नाविन्यपूर्ण उपक्रमाची वरिष्ठ पातळीवरून दखल घेतली गेल्याने, सर्व अधिकारी, कर्मचारी व मार्गदर्शक शिक्षक यांचे मनोबल उंचावले आहे.

भेटीच्या शेवटी मा.सचिव महोदय यांनी प्रकल्प कार्यालयास भेट देवून राणी दुर्गावती माहिती सुविध केंद्र आणी प्रकल्प कार्यालयामार्फत नाविण्यपूर्ण योजनेतुन नव्यानेच राबविण्यात येत असलेल्या सोयी सुविधायुक्त फिरते ईलेक्ट्रिानिक प्रचार प्रसिध्दी वाहन तसेच स्वच्छता मशिन ची पाहाणी करुन आधुनिक यंत्रणमुळे कमी कर्मचाऱ्याच्या मदतीने शाळा व वसतीगृह स्वच्छता राहण्यास मदत होईल तसेच फिरते ईलेक्ट्रिानिक प्रचार प्रसिध्दी वाहनाच्या मदतीने विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध योजनाची प्रसिध्दी होऊन आदिवासी बांधवापर्यंत योजनेचा लाभ देवुन विकास साधता येईल असे मत व्यक्त केले.

# साधेपणातून उभा राहिलेला समाजसेवेचा दीपस्तंभ : युवा समाजसेवक सचिन काटे यांना राज्यस्तरीय समाजसेवा पुरस्कार

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्स्ना करवाडे विदर्भ संपादिका** : मेहकर (बुलढाणा) समाजासाठी निस्वार्थ भावनेने काम करणारी माणसं आजही समाजात आहेत, याची जाणीव करून देणारं नाव म्हणजे युवा समाजसेवक सचिन अंबादास काटे. सन्माननीय भरत शेठ गोगावले यांचे ओएसडी म्हणून कार्यरत असलेले सचिन काटे हे आज युवकांमध्ये प्रेरणास्थान ठरत असून त्यांच्या सामाजिक कार्याची राज्यस्तरावर दखल घेण्यात आली आहे. संतश्रेष्ठ गजानन महाराज संस्थान, बीबी यांच्या वतीने आयोजित १७ व्या राज्यस्तरीय संतश्रेष्ठ गजानन महाराज गुणगौरव सोहळा २०२६ मध्ये त्यांना प्रतिष्ठेचा "समाजसेवा पुरस्कार" प्रदान करण्यात आला.

सचिन काटे हे नावाजलेल्या घराण्यातील असले तरी त्यांच्या स्वभावात श्रीमंतीचा कसलाही गर्व दिसून येत नाही. साधं राहणीमान, शांत स्वभाव आणि सर्वसामान्य माणसांमध्ये मिसळून जाण्याची त्यांची वृत्ती यामुळे ते समाजात वेगळी ओळख निर्माण करण्यात यशस्वी ठरले आहेत. अनेकदा एखाद्या गरीबाच्या घरात जाऊन त्यांची अडचण समजून घेणारा, विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी मदत करणारा आणि संकटात सापडलेल्या कुटुंबांच्या पाठीशी उभा राहणारा चेहरा म्हणून सचिन काटे यांच्याकडे पाहिले जाते.



सन्माननीय भरत शेठ गोगावले यांचे ओएसडी म्हणून जबाबदारी सांभाळताना देखील सचिन काटे यांनी समाजकार्याची नाळ कधी तुटू दिली नाही. उलट युवक, विद्यार्थी, बेरोजगार तरुण आणि गरजू कुटुंबांसाठी त्यांनी अधिक जोमाने काम केले. युवकांना सकारात्मक विचारांची दिशा देणे,व्यसनमुक्तीबाबत जनजागृती करणे, सामाजिक सलोखा निर्माण करणे,रक्तदान शिबिरांचे आयोजन,गरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देणे,तसेच आरोग्य शिबिरांच्या माध्यमातून लोकांपर्यंत मदतीचा हात पोहोचवणे अशा विविध उपक्रमांत ते नेहमीच अग्रेसर राहिले आहेत. आजच्या काळात अनेक जण पद, पैसा आणि प्रसिद्धी मिळाल्यानंतर सामान्य लोकांपासून दूर जातात. मात्र सन्माननीय भरत शेठ गोगावले यांचे ओएसडी असलेले सचिन काटे हे पदापेक्षा माणुसकीला अधिक महत्त्व देतात. त्यामुळेच युवकांमध्ये त्यांच्याबद्दल मोठा आदर निर्माण झाला आहे. "मोठ्या घरातील मुलगा असूनही जमिनीवर राहणारा माणूस" अशी त्यांची ओळख परिसरात निर्माण झाली आहे.

**■ सन्माननीय भरत शेठ गोगावले यांचे ओएसडी असलेल्या तडफदार युवा नेतृत्वाचा गौरव**

**■ गोरगरिबांच्या मदतीसाठी कायम धावणाऱ्या व्यक्तिमत्त्वाला राज्यस्तरीय मान्यता**

> **"समाजातील गरजू, वंचित आणि युवकांसाठी काम करत असताना लोकांनी दिलेलं प्रेम हीच माझी खरी ताकद आहे. मला मिळालेला हा राज्यस्तरीय पुरस्कार माझ्यासाठी केवळ सन्मान नसून समाजासाठी आणखी जोमाने काम करण्याची प्रेरणा आहे. सन्माननीय भरत शेठ गोगावले यांच्यासारख्या नेतृत्वाखाली काम करण्याची संधी मिळत असल्याने समाजसेवेची प्रेरणा अधिक वाढली आहे. पुढेही शेवटच्या घटकापर्यंत मदतीचा हात पोहोचवण्यासाठी मी प्रामाणिकपणे कार्य करत राहणार आहे."**
>
> **— सचिन अंबादास काटे**
> **युवा समाजसेवक**

सचिन काटे यांनी केलेल्या सामाजिक कार्यामुळे अनेक युवक समाजकार्याकडे वळत आहेत. त्यांच्या तडफदार नेतृत्वामुळे आणि मनमिळाऊ स्वभावामुळे समाजातील प्रत्येक घटकाशी त्यांची जवळीक निर्माण झाली आहे. गोरगरिबांच्या डोळ्यातील अश्रू पुसण्यासाठी धावून जाणारा नेता म्हणून अनेकजण त्यांच्याकडे आशेने पाहतात. म्हणूनच त्यांच्या या सन्मानामुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.या गुणगौरव सोहळ्यास सुप्रसिद्ध कीर्तनकार किशोर महाराज थोरेले, संतोष खारडे, चंद्रकांत पाटील, जगण मामा सहाणे, गोपाल महाराज टेके, रफिक सैय्यद, माऊली गायकवाड तसेच विकास इवरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे आयोजन संस्थान विश्वस्त गोविंद टेके यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. सूत्रसंचालन गोपाल महाराज टेके यांनी केले तर पसायदानाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# भगवान गौतम बुद्ध, डॉ .बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराजांची संयुक्त जयंती साजरी

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर)** : बहुजन विद्यार्थी संघटना व रिपब्लिकन सेना पेण शहराच्या वतीने भगवान गौतम बुद्ध, भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर व महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा संयुक्त जयंती महोत्सव पेण शहरांमध्ये पार पडला. त्यावेळेला या प्रसंगी रिपब्लिकन सेनेचे युवा नेते अमन आनंदराज आंबेडकर यांचे प्रमुख मार्गदर्शन लाभले.याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पार्टीचे रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे उपस्थित



होते . त्यांचे स्वागत अमन आनंदराज आंबेडकर यांनी पुष्पगुच्छ देऊन केले . त्यांच्यासोबत अमित कांबळे नागेश सुर्वे , समीर घायतळे, मयूर वनगे, मयूर गायकवाड ,भारत दाताड इत्यादी स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पक्षाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# मानवतेचा जिवंत संदेश! जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राच्या कर्मचाऱ्यांचे रक्तदान

**दैनिक युवक आधार**

**रोशन खोब्रागडे भंडारा** : सामाजिक बांधिलकी जपत जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, सामान्य शासकीय रुग्णालय भंडारा येथील पदाधिकारी व कर्मचाऱ्यांनी रक्तदान करून मानवतेचा प्रेरणादायी संदेश दिला. रूग्णमित्र म्हणून परिचित असलेले जयेंद्र देशपांडे यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या या रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

रक्ताची गरज भासणाऱ्या रुग्णांना वेळेवर मदत मिळावी आणि समाजात रक्तदानाबाबत जनजागृती व्हावी, या उद्देशाने आयोजित शिबिरात अनेकांनी स्वेच्छेने रक्तदान केले. "रक्तदान हेच श्रेष्ठ दान" हा संदेश प्रत्यक्ष कृतीतून देत कर्मचाऱ्यांनी सामाजिक



उत्तरदायित्व जपल्याचे पाहायला मिळाले.यावेळी सुज्ञान सोनवणे, बुद्धभूषण खोब्रागडे, प्रतिक पाटील, ज्ञानेश्वरी बुराडे, दादू मधुकर बांते, भास्कर सव्वालखे, सुनील कहालकर तसेच राजेंद्र नेवारे उपस्थित होते.या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत असून, अशा सामाजिक कार्यातून समाजात सकारात्मक ऊर्जा निर्माण होत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# सोयगाव दूध संघाच्या चेअरमन पदी गोपिचंद जाधव,व्हाइस चेअरमन पदी शिवदास राजपूत बिनविरोध

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी विजय काळे** : सोयगाव तालुका शेतकरी सहकारी दूध संघाच्या चेअरमनपदी गोपीचंद गबरू जाधव तर व्हाईस चेअरमनपदी शिवदास लालचंद राजपूत यांची बिनविरोध निवड करण्यात आली. या निवडीबद्दल आमदार अब्दुल सत्तार यांच्या हस्ते नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.यावेळी बोलताना आमदार अब्दुल सत्तार यांनी सहकार क्षेत्र हे ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असल्याचे सांगितले. दूध संघाच्या माध्यमातून शेतकरी हिताचे निर्णय घेऊन संस्थेची प्रगती साधावी, असे आवाहन त्यांनी केले. नव्या पदाधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांचा विश्वास कायम ठेवत दूध संघ अधिक सक्षम करण्यासाठी प्रयत्न करावेत, असेही त्यांनी नमूद केले.

नवनिर्वाचित चेअरमन गोपीचंद जाधव व व्हाईस चेअरमन शिवदास राजपूत यांनी संघाच्या विकासासाठी प्रामाणिकपणे कार्य करण्याची ग्वाही दिली. तसेच दूध संघाशी संबंधित शेतकरी व सभासदांच्या हिताला प्राधान्य देण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमास जिल्हा बँकेचे चेअरमन अर्जुन पा.गाढे यांच्यासह शिवआप्पा चोपडे,धरमसिंग चव्हाण, सलीम पठाण,शेख जावेद खालेक, फिरोज पठाण, समाधान तायडे, उमर पठाण, गंगाधर सदाशिवे,मेघराज राठोड, हमीदाबी तडवी, हाफिजाबी कदिर पठाण, सांडू तडवी,कुणाल राजपूत, गणेश खैरे,भागवत अंभोरे तसेच शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गावकऱ्यांना मिळकत पत्रिकेसाठी आता पैसे मोजावे लागणार नाहीत : महसूलमंत्री बावनकुळे यांची घोषणा

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी मुंबई** :स्वामित्व योजनेतून गावकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. आता ग्रामस्थांना मिळकत पत्रिका मोफत दिली जाणार असून सनद फी देखील माफ करण्याची महत्त्वाची घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली आहे.

फोर्ट येथील कोकण विभागीय आयुक्तालयात गुरुवारी झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. महसूलमंत्री बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीस ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, जमाबंदी आयुक्त तथा ग्रामविकास विभागाचे सचिव चंद्रकांत पुलकुंडवर आणि महसूल विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

39 हजार मालमत्तांची आधुनिक मोजणी पूर्ण

बैठकीत माहिती देताना मंत्री बावनकुळे म्हणाले, "महसूल विभागाने राज्यातील 23 हजार ग्रामपंचायतींमधील 39 हजार मालमत्तांची अद्ययावत ड्रोन व रोव्हर उपकरणांद्वारे मोजणी पूर्ण केली आहे. या मोजणीच्या आधारे आता ग्रामपंचायत नमुना 8 दुरुस्त केला जाणार आहे.

नमुना 8 दुरुस्त झाल्यानंतर प्रत्येक मालमत्ताधारकाला



मिळकत पत्रिका म्हणजेच प्रॉपर्टी कार्ड दिले जाईल. ही पत्रिका पूर्णपणे मोफत असेल. याशिवाय सनद देताना आकारली जाणारी सनद फी देखील माफ करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, असे बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

या निर्णयाची तातडीने अंमलबजावणी व्हावी यासाठी ग्रामविकास विभागाने तात्काळ प्रस्ताव तयार करून त्यास मंजूरी घ्यावी, असे निर्देशही महसूलमंत्र्यांनी यावेळी दिले.

केंद्र शासनाच्या स्वामित्व योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील घरांची व मालमत्तांची मोजणी करून मालकी हक्काचे दस्तऐवज दिले जातात. या निर्णयामुळे ग्रामीण नागरिकांना बँक कर्ज, मालमत्ता हस्तांतरण व इतर कायदेशीर कामांसाठी अधिकृत दस्तऐवज मिळणार आहे. सनद फी माफ झाल्याने सर्वसामान्य गावकऱ्यांचा आर्थिक भारही कमी होणार आहे.या निर्णयाचे ग्रामीण भागातून स्वागत होत असून हजारो कुटुंबांना त्याचा थेट लाभ मिळणार आहे.

# जनगणनेला सहकार्य करा - तहसीलदार शीतल घावटे

**लाखनी तालुका सरपंच संघटना बहिष्कारावर ठाम चान्ना ग्रामपंचायतीचाही बहिष्काराचा इशारा**

**दैनिक युवक आधार**

**भंडारा भावेश धंधुकीया जिल्हा प्रतिनिधी** : तालुक्यात ओबीसी जनगणनेच्या प्रश्नावर सर्व सामान्य जनतेत तीव्र भावना आहेत . या अनुसंगाने जनगणनेच्या प्रक्रियेमध्ये 'ओबीसी' प्रवर्गासाठी स्वतंत्र कॉलम असावा, या प्रमुख मागणीसाठी लाखनी तालुका सरपंच संघटनाही कमालीची आक्रमक झाली. संघटनेच्या वतीने आज, २१ मे रोजी तहसीलदार शीतल घावटे आणि गट विकास अधिकारी संदीप पानतावणे यांना अधिकृतपणे 'जनगणना बहिष्कार पत्र' सादर करण्यात आले. दरम्यान, चान्ना ग्रामपंचायतीनेही या आंदोलनाला पाठिंबा देत स्वतंत्रपणे आपले बहिष्कार पत्र प्रशासनाकडे सोपवले आहे. केवळ घरगणना आहे, सहकार्य करा: तहसीलदार घावटे निवेदन स्वीकारताना तहसीलदार शीतल घावटे यांनी सरपंच संघटनेला सामोपचाराने सहकार्य करण्याचे आवाहन केले.

त्या म्हणाल्या, "सध्या सुरू असलेली प्रक्रिया ही केवळ घरगणना (हाउसिंग लिस्टिंग) आहे. मुख्य जनगणनेची प्रक्रिया २०२७ मध्ये होणार आहे. त्यामुळे सर्व सरपंचांनी या टप्प्यावर विरोध न करता प्रशासनाला सहकार्य करावे असे मत मांडले. घरगणनेत मग जातीचा प्रश्न का? : शरद इटवले तहसीलदारांच्या या आवाहनावर सरपंच संघटनेचे जिल्हाध्यक्ष शरद इटवले यांनी तीव्र आक्षेप घेतला .

"जर ही केवळ घरगणना आहे, तर मग 'घर कोणत्या जाती प्रवर्गाचे आहे?' असा प्रश्न नागरिकांना का विचारला जात आहे?" असा थेट सवाल त्यांनी उपस्थित केला. जात विचारली जात असेल, तर मग ओबीसींचा स्वतंत्र कॉलम का नाही, अशी भूमिका त्यांनी मांडली. =ओबीसींची अचूक संख्या तसेच ओबीसी समाजाची सामाजिक व आर्थिक परिस्थिती समोर येण्यासाठी जनगणनेत एससी,एसटी प्रमाणे ओबीसीचा स्वतंत्र कॉलम असणे अत्यंत गरजेचे आहे. तोपर्यंत आमचा विरोध कायम राहील. — परसराम फेंडरकर, तालुकाध्यक्ष, सरपंच संघटना निवेदन देताना सरपंच संघटनेचे जिल्हाध्यक्ष शरद इटवले, लाखनी तालुका अध्यक्ष परसराम फेंडरकर, कार्यवाह रुपचंद निर्वान,सरपंच लता शेंडे, शाम बेंदेवार, नरेश फुंडे, सूरज निखाडे, भागवत बारस्कर आणि राजेश इसापुरे प्रामुख्याने उपस्थित होते.

चान्ना ग्रामपंचायतीचे स्वतंत्र बहिष्कार पत्र याच आंदोलनाचा भाग म्हणून चान्ना ग्रामपंचायतीच्या वतीनेही तहसीलदार शीतल घाटगे यांना बहिष्काराचे पत्र देण्यात आले. यावेळी सरपंच परसराम फेंडरकर, माजी जिल्हा परिषद सदस्य जयकृष्ण फेंडरकर, डॉ. बाळकृष्ण सार्वे, अनिकेत गोस्वामी, होमराज बनकर, रामदास सार्वे यांच्यासह अनेक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या आंदोलनामुळे तालुक्यात जनगणनेच्या मुद्द्यावरून राजकीय आणि सामाजिक वातावरण चांगलेच तापले आहे.

# बी.एस्सी नर्सिंग प्रवेशासाठी आता 'शून्य परसेंटाईल'ने प्रवेश

**■ शिक्षणाच्या दारात उभ्या असलेल्या वंचित विद्यार्थ्यांसाठी आशेचा किरण...**
**■ मंत्री हसन मुश्रीफ यांचे बैठकीत विद्यार्थीहिताचे संकेत**

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर:** अनेकदा एखादा विद्यार्थी अभ्यासात मेहनत घेतो, आई-वडील कष्ट करून मुलाला शिकवतात, पण स्पर्धा परीक्षा, माहितीचा अभाव किंवा परिस्थितीच्या मर्यादांमुळे त्याची स्वप्न दारातच थांबतात. विशेषत: ग्रामीण भागातील, शेतकरी कुटुंबातील, मजूर, आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि वंचित घटकातील विद्यार्थ्यांच्या बाबतीत हे चित्र वारंवार दिसून येते. मात्र आता अशा हजारो विद्यार्थ्यांसाठी एक आशेचा किरण दिसू लागला आहे. विशेषत: ग्रामीण, वंचित आणि आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळावी यासाठी 'झिरो परसेंटाईल'च्या आधारे प्रवेश प्रक्रियेचा विचार करून त्याची नोंद प्रवेश पुस्तिकेत करण्याचे निर्देश वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांनी दिले आहे.



राज्यातील बी.एस्सी नर्सिंग अभ्यासक्रमातील प्रवेश पात्रतेत बदल करण्यासाठी मंत्रालयात बुधवारी (दि.२०) वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. बैठकीस वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री माधुरी मिसाळ, सचिव धिरजकुमार, आयुक्त अनिल भंडारी, डॉ. राजेंद्र बंगाळ, अर्चना बढे, अरूण कदम, डॉ. बाळासाहेब पवार, प्रताप माने, डॉ. शिल्पा पाटील, डॉ. प्रदीप पाटील, डॉ. सुहास सुर्यवंशी,डॉ. जुबेर सनदी, डॉ. रिया भोंबडे, शंकरराव आडसुळ, विनोद गायकवाड, डॉ. बाळासाहेब घुले, डॉ. भगिरथ जाधव, जयंत नाईकवाडे, सचिन देसाई, संजय वाघमारे, विठ्ठल चव्हाण, अनुराधा वर्मा उपस्थित होते. आजही राज्यातील अनेक ग्रामीण भागात विद्यार्थ्यांना बी.एस्सी नर्सिंग अभ्यासक्रमासाठी सीईटी परीक्षा द्यावी लागते याची पुरेशी माहिती नसते. अनेक विद्यार्थ्यांना कोचिंगची सुविधा नसते. कुणाच्या वडिलांची शेती दुष्काळामुळे अडचणीत असते, तर कुणाची आई मजुरी करून घर चालवत असते. अशा परिस्थितीत काही गुण कमी पडले म्हणून विद्यार्थ्यांच्या आयुष्याची दारे बंद व्हावीत का, हा प्रश्न बैठकीत प्रकर्षाने पुढे आला. बैठकीत मांडलेल्या आकडेवारीनेही एक चिंताजनक वास्तव समोर आणले. राज्यात दरवर्षी हजारो जागा रिक्त राहत आहेत, तर दुसरीकडे अनेक विद्यार्थ्यांची स्वप्ने प्रवेशाच्या अटींमध्ये अडकत आहेत. ही तफावत दूर करण्यासाठी खाजगी नर्सिंग कॉलेज मॅनेजमेंट असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. बाळासाहेब पवार आणि इतर प्रतिनिधींनी ठोस मांडणी केली. प्रताप माने यांनी मागील वर्षी लागू करण्यात आलेल्या ' शून्य परसेंटाईल'चा आधार यंदाही कायम ठेवावा, अशी मागणी केली. या मागणीवर मंत्री हसन मुश्रीफ यांनी सकारात्मक भूमिका घेत संबंधित विभागाला आवश्यक मान्यता घेऊन प्रवेश पुस्तिकेत याचा समावेश करण्याबाबत निर्देश दिले.

**नर्सिंग सीईटी न दिलेल्या विद्यार्थ्यांनाही प्रवेशाचा पर्याय**

बैठकीत आणखी एक महत्त्वाचा मुद्दा मांडण्यात आला की, ज्या विद्यार्थ्यांनी इतर सीईटी परीक्षा दिल्या आहेत आणि त्यांनी बारावी विज्ञान शाखेत इंग्रजी, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि जीवशास्त्र विषयांसह उत्तीर्णता मिळवली आहे, त्यांनाही बी.एस्सी नर्सिंगसाठी पात्र करण्याचा पर्याय विचारात घ्यावा. यावर शासनाने सकारात्मक भूमिका दर्शविली. तसेच ज्या विद्यार्थ्यांनी नीट परीक्षा उत्तीर्ण केली आहे

त्यांनाही बी.एस्सी नर्सिंग प्रवेशासाठी पात्र करण्याबाबतही शासन सकारात्मक असल्याचे मंत्री हसन मुश्रीफ यांनी स्पष्ट केले.

याशिवाय महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठामार्फत राज्यभर मोठ्या प्रमाणावर जनजागृती आणि प्रचार मोहीम राबवून विद्यार्थ्यांना बी.एस्सी नर्सिंग अभ्यासक्रमाकडे आकर्षित करण्याचे आदेशही देण्यात आले.

# सीमावर्ती भागात अवैध माती तस्करी जोरात; भरदुपारी कालव्याचा रस्ता रोखणाऱ्या 'त्या' ट्रॅक्टरवर कारवाई होणार का?

**दैनिक युवक आधार**

**दिग्रस प्रतिनिधीउमेश साखरकर** : दिग्रस तालुक्यातील शेवटच्या टोकावर असलेल्या गावांमध्ये सध्या अवैध माती तस्करीने चांगलाच ऊत आणला आहे. महसूल आणि संबंधित प्रशासनाच्या डोळयात धूळ फेकत रात्रंदिवस सुरू असलेल्या या अवैध उपशामुळे आणि वाहतुकीमुळे स्थानिक गावकऱ्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. अशातच २१ मे रोजी दुपारी एक संतापजनक प्रकार समोर आला असून, एका माती वाहून नेणाऱ्या ट्रॅक्टरचे टायर फुटल्याने अरुणावती कालव्यावरील रस्ता चक्क चार ते पाच तास पूर्णपणे ठप्प झाला होता. यामुळे परिसरातून ये-जा करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रचंड त्रासाला सामोरे जावे लागले.तालुक्यातील सीमावर्ती भागातील गावांमध्ये काही विटभट्टी चालकांकडून बेकायदेशीरपणे मातीची उत्खनन व वाहतूक केली जात आहे. २१ मे रोजी दुपारच्या सुमारास एका विटभट्टीवरील ओव्हरलोड (अतिभार) माती घेऊन जाणाऱ्या ट्रॅक्टरचे टायर अचानक अरुणावती कालव्याच्या रस्त्यावर फुटले. ट्रॅक्टरचा टायर रस्त्याच्या मधोमध फुटल्याने आणि पर्यायी रस्ता नसल्याने हा मार्ग पूर्णपणे बंद झाला.सध्या खरीप हंगामाच्या पूर्वतयारीची कामे वेगाने सुरू आहेत. त्यामुळे शेतकरी, शेतमजूर आणि शेतीचे साहित्य घेऊन जाणाऱ्या वाहनांची या रस्त्यावर मोठी वर्दळ असते. मात्र, या अवैध माती तस्करी करणाऱ्या ट्रॅक्टरमुळे तब्बल चार ते पाच तास हा रस्ता अडकून पडला होता. कडक उन्हात शेतकरी आणि ग्रामस्थांना रस्त्याच्या दुतर्फा ताटकळत उभे राहावे लागले. अनेक शेतकऱ्यांना आपल्या शेतात पोहोचता आले नाही, तर काहींना लांबचा वळसा घालून जावे लागले, ज्यामुळे त्यांचा वेळ आणि पैसा वाया गेला. "या भागात अवैध माती उपसा करणारे ट्रॅक्टर अत्यंत निष्काळजीपणे आणि अतिवेगाने चालवले जातात. प्रशासनाचे याकडे अजिबात लक्ष नाही. आज तर थेट मुख्य रस्ताच चार-पाच तास अडवून धरल्याने आमचे मोठे नुकसान झाले. या तस्करांवर कडक कारवाई झालीच पाहिजे."तालुक्यातील शेवटच्या टोकावर असलेली गावे असल्याने या भागात महसूल विभागाचे अधिकारी फिरकतही नसल्याचा आरोप गावकऱ्यांनी केला आहे. याच गोष्टीचा फायदा घेऊन माती तस्कर शासनाचा महसूल बुडवून पर्यावरणाची हानी करत आहेत आणि गावातील रस्त्यांची दुरवस्था करत आहेत.

आता या गंभीर घटनेनंतर तरी दिग्रसचे तहसीलदार आणि पोलीस प्रशासन या अवैध माती तस्करी करणाऱ्यांवर आणि रस्त्यावर वाहतुकीचा खेळखंडोबा करणाऱ्या विटभट्टी चालकांवर दंडात्मक व कायदेशीर कारवाई करणार का? की याकडे नेहमीप्रमाणे कानाडोळा केला जाईल, असा संतप्त सवाल तालुक्यातील शेतकरी विचारत आहेत.

# स्वराज्य'च्या इंटिरिअर कामाला ब्रेक; कोकण रेल्वेला महापालिकेची कायदेशीर नोटीस

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर)** : पालिकेचे महत्त्वाकांक्षी मुख्यालय असलेल्या 'स्वराज्य' इमारतीच्या अंतर्गत सजावटीच्या कामात मोठी दिरंगाई होत असल्याने महापालिकेने कोकण रेल्वे कॉर्पोरेशन कंपनीला कायदेशीर नोटीस बजावली आहे. ठरलेल्या टप्प्यांनुसार कामाचा वेग नसल्याने प्रशासनाने अखेर कठोर भूमिका घेतली आहे.

पनवेल नगरपरिषदेचे महापालिकेत रूपांतर झाल्यानंतर कामाचा व्याप मोठ्या प्रमाणात वाढला. अधिकारी व कर्मचाऱ्यांची संख्या वाढल्याने जुनी इमारत अपुरी पडू लागली होती. त्यामुळे महापालिकेने सिडकोकडून तब्बल 28 कोटी रुपये खर्च करून 5 एकर भूखंड विकत घेतला. कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमीसमोरील या जागेवर 'स्वराज्य' मुख्यालयाची उभारणी

**महापालिकेच्या 'स्वराज्य' मुख्यालयातील इंटिरिअरचे काम अपेक्षित गतीने होत नाही. यापूर्वी कंपनीच्या निदर्शनास ही बाब आणून दिली होती. मात्र सुधारणा न झाल्याने अखेर कायदेशीर नोटीस पाठवण्यात आली आहे.**
**- संजय कटेकर, शहर अभियंता,**
**पनवेल महापालिका**

अंतिम टप्प्यात आली आहे. दरम्यान, इमारतीतील फर्निचर, इलेक्ट्रिकल व्यवस्था, फाइल सिस्टीम आणि इतर अंतर्गत सजावटीसाठी 162 कोटी रुपयांचे कंत्राट कोकण रेल्वे कॉर्पोरेशन कंपनीला देण्यात आले होते. मे 2027 पर्यंत काम पूर्ण करण्याची हमी कंपनीने दिली होती. मात्र, प्रत्यक्षात काम सुरू होऊन सहा महिने उलटूनही कामाचा वेग अत्यंत मंद असल्याचे समोर आले आहे. महापालिकेने यापूर्वी अंतर्गत नोटीस देत कामाच्या गतीबाबत नाराजी व्यक्त केली होती. तरीही परिस्थितीत सुधारणा न झाल्याने अखेर गेल्या आठवड्यात कंपनीला कायदेशीर नोटीस बजावण्यात आली. आता या नोटिसीला समाधानकारक उत्तर न दिल्यास अथवा कामात गती न आणल्यास कंपनीचे कंत्राट रद्द करण्याची शक्यता व्यक्त होत आहे. 'स्वराज्य' या भव्य मुख्यालयाच्या बांधकामासाठी महापालिकेने सुमारे 140 कोटी रुपये खर्च केले आहेत. आता प्रशासनाचा भर अंतर्गत सजावटीची कामे वेगाने पूर्ण करून अधिकारी-कर्मचाऱ्यांचे स्थलांतर नव्या वास्तूत करण्यावर आहे. अन्यथा सध्याच्या विविध कार्यालयांच्या देखभालीचा अतिरिक्त आर्थिक भार महापालिकेवर कायम राहणार आहे.

# रिसोड पोलिसांची दमदार कामगिरी; अवघ्या काही तासांत ६ लाखांहून अधिक किमतीचे दागिने हस्तगत!

**दबंग ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली चोरी प्रकरणाचा झपाट्याने उलगडा**

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : रिसोड शहरातील बसस्थानक परिसरातून चोरीस गेलेल्या तब्बल ₹६ लाख १२ हजार ८०० रुपयांच्या सोन्या-चांदीच्या दागिन्यांचा रिसोड पोलिसांनी अवघ्या काही तासांत शोध लावून पुन्हा एकदा आपल्या कार्यक्षमतेची चुणूक दाखवून दिली आहे. या कारवाईमुळे संपूर्ण शहरात रिसोड पोलिसांचे कौतुक होत असून, विशेषतः सन्माननीय ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांच्या धडाकेबाज कार्यपद्धतीची जोरदार चर्चा सुरू आहे.

रिसोड बसस्थानक परिसरात घडलेल्या या चोरीच्या घटनेने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मोठ्या किमतीचे दागिने चोरीला गेल्याने पोलिसांसमोर मोठे आव्हान उभे राहिले होते. मात्र रिसोड पोलिस स्टेशनचे सन्माननीय ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांनी घटनेची गंभीर दखल घेत तात्काळ तपासाची सूत्रे हलवली आणि संपूर्ण यंत्रणा कामाला लावली.CCTV फुटेज तपासणी तांत्रिक विश्लेषण गोपनीय माहितीदारांचे जाळे

या सर्वांच्या आधारे पोलिसांनी संशयित महिलेचा शोध घेत तिला ताब्यात घेतले. चौकशीत चोरीचा गुन्हा



उघडकीस आला आणि चोरीस गेलेले दागिने जप्त करण्यात पोलिसांना यश आले.

या संपूर्ण कारवाईत सन्माननीय ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांचे नियोजन, वेगवान निर्णयक्षमता आणि तपासातील अचूकता विशेष ठरली. त्यांनी स्वतः या प्रकरणावर बारकाईने लक्ष ठेवत पोलिस पथकाला योग्य दिशा दिली. त्यामुळेच अल्पावधीत चोरीचा उलगडा होऊन आरोपी पोलिसांच्या ताब्यात आला.

रिसोड शहरात जेव्हापासून ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांनी पदभार स्वीकारला आहे, तेव्हापासून गुन्हेगारांमध्ये एक मोठी दहशत निर्माण झाली असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. चोरी, अवैध धंदे आणि गुन्हेगारी प्रवृत्तीवर त्यांनी कठोर कारवाईचा बडगा उगारल्याने गुन्हेगारांचे धाबे दणाणले आहेत. "रिसोडमध्ये गुन्हा केला तर पोलिसांच्या तावडीतून सुटका नाही," अशी भावना आता गुन्हेगारी जगतात निर्माण झाली आहे.

सन्माननीय ठाणेदार रामेश्वर चव्हाण हे केवळ कठोर आणि दबंग अधिकारी नसून सर्वसामान्य नागरिकांशी अत्यंत साधेपणाने वागणारे अधिकारी म्हणूनही ओळखले जातात. तक्रारदाराला न्याय मिळावा, सर्वसामान्य माणसाचे ऐकून घ्यावे आणि गुन्हेगारांवर कठोर कारवाई व्हावी, या भूमिकेमुळे त्यांनी नागरिकांच्या मनात वेगळे स्थान निर्माण केले आहे. रिसोड पोलिस स्टेशनला रामेश्वर चव्हाण यांच्यासारखे कार्यक्षम, प्रामाणिक आणि जनतेसाठी झटणारे अधिकारी लाभणे ही

**"रिसोड शहरातील नागरिकांची सुरक्षा हीच आमची सर्वोच्च प्राथमिकता आहे. कोणताही गुन्हा घडला तर त्याचा तात्काळ आणि सखोल तपास करून आरोपींना कायद्याच्या चौकटीत आणले जाईल. गुन्हेगारांनी कितीही शक्कल लढवली तरी रिसोड पोलिस त्यांच्यापर्यंत पोहोचणारच. नागरिकांनीही सतर्क राहून पोलिसांना सहकार्य करावे,"**
**— सन्माननीय ठाणेदार रामेश्वर चव्हाण, रिसोड पोलीस स्टेशन**

शहरासाठी अभिमानाची बाब मानली जात आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली पोलिस दल अधिक सतर्क, अधिक आक्रमक आणि नागरिकांच्या सुरक्षेसाठी कटिबद्ध झाल्याचे चित्र दिसून येत आहे.

या यशस्वी कारवाईमुळे शहरातील नागरिकांनी रिसोड पोलिसांचे अभिनंदन करत समाधान व्यक्त केले आहे. विशेष म्हणजे महिलांच्या सहभागातून घडलेल्या चोरीच्या गुन्ह्याचाही पोलिसांनी वेगाने तपास करत उलगडा केल्याने पोलिसांच्या तपास कौशल्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# किनवट रेल्वे स्टेशनंचे काम उत्कृष्ट मात्र अंडरब्रिजचे काम निकृष्ट..! नागरिकांमध्ये तीव्र संताप!

**■ युवानेते करण एंड्रलवार यांचा थेट रेल्वे मंत्रालयाकडे पाठपुरावा**
**■ कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकण्याची मागणी**

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी, विश्वदीप कांबळे किनवट** : हिंगोली लोकसभा मतदारसंघाचे खासदार नागेश पाटील आष्टीकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे अमृत भारत योजनेअंतर्गत किनवट रेल्वे स्थानकाच्या आधुनिकीकरणाचे काम वेगाने सुरू आहे. या योजनेमुळे किनवट रेल्वे स्थानकाची 'स्मार्ट रेल्वे स्टेशन'कडे वाटचाल सुरू झाली असली, तरी स्टेशनलगत असलेल्या शिवाजीनगर येथील रेल्वे भुयारी मार्गच्या निकृष्ट बांधकामामुळे स्थानिक नागरिक आणि प्रवाशांमधून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या कामासंदर्भात युवानेते करण एंड्रलवार यांनी आता खासदार नागेश पाटील अष्टीकर यांच्यामार्फत थेट रेल्वे मंत्रालयाकडे पाठपुरावा सुरू केला असून भुयारी मार्गाच्या निकृष्ट बांधकामाची तात्काळ चौकशी करून कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकावे अशी मागणी त्यांनी केली आहे शिवाजीनगर रेल्वे अंडरब्रिजच्या रस्त्यावरून वाहने जाताना मोठ्या प्रमाणात सिमेंटची धूळ उडत आहे. या उडणाऱ्या धुळीमुळे परिसरातील नागरिकांना श्वसनाचे त्रास, डोळ्यांची जळजळ आणि इतर गंभीर आरोग्यविषयक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. याचा सर्वाधिक फटका शालेय विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, दुचाकीस्वार आणि परिसरातील रहिवाशांना बसत असून नागरिकांचे आरोग्य पूर्णपणे धोक्यात आले आहे.दरम्यान या अंडरब्रिजचे काम सुरू झाल्यापासूनच कामाच्या दर्जाबाबत नगराध्यक्षा सौ सुजाता एंड्रलवार यांनी गंभीर दखल घेतली आहे. हे काम दर्जेदार व्हावे यासाठी त्यांनी रेल्वे प्रशासनाकडे सातत्याने निवेदने सादर करून पाठपुरावा सुरू ठेवला आहे. "अंडरब्रिजची तातडीने तांत्रिक तपासणी करण्यात यावी, रस्त्यावर तात्काळ डांबरीकरण करावे, संबंधित कंत्राटदारावर कडक कारवाई करून नागरिकांना या त्रासातून कायमस्वरूपी दिलासा



द्यावा," अशी आग्रही मागणी नगराध्यक्षां सौ सुजाता विनोद एंड्रलवार यांनी लावून धरली आहे.

दरम्यान, या गंभीर समस्येची दखल घेत युवानेते करण एंड्रलवार यांनी थेट खासदार नागेश पाटील आष्टीकर यांच्या माध्यमातून रेल्वे मंत्रालयाकडे या प्रकरणाचा पाठपुरावा सुरू केला आहे. "एकीकडे खासदारांच्या प्रयत्नांमुळे रेल्वे स्टेशनचे रूप पालटत असताना, दुसरीकडे कंत्राटदाराच्या मनमानीमुळे अंडरब्रिजचे काम अत्यंत सुमार दर्जाचे होत आहे," असा आरोप त्यांनी केला.रेल्वे स्टेशनप्रमाणेच अंडरब्रिजचे कामही उत्कृष्ट दर्जाचे झाले पाहिजे, अशी मागणी करत युवानेते करण एंड्रलवार यांनी या पुलाच्या निकृष्ट बांधकामाची तात्काळ उच्चस्तरीय चौकशी करून दोषी कंत्राटदारावर कठोर कारवाई करावी आणि तातडीने काळ्या टाकावे, अशी आक्रमक मागणी केली आहे. रेल्वे प्रशासन आता यावर काय कारवाई करते, याकडे संपूर्ण किनवटवासियांचे लक्ष लागले आहे.

# फसवणुकी प्रकरणी गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी :**बोगस व्यक्ति खरे मालक असल्याचे भासवून बोगस खरेदी विक्री करार पत्र बनवल्या प्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात 20 मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. यातील फिर्यादी मोहम्मद नदीम हिदाईतुल्ला खान आणि त्यांचा भाऊ जमान खान यांच्या मालकीची तुर्भे (पनवेल) येथे तीस गुंठे जमीन आहे. मोहम्मद आणि त्यांचा भाऊ जमान यांच्या नावाने बोगस व्यक्ती उभ्या करून आणि त्यांचे खोटे आधार कार्ड, पॅन कार्ड आणि इतर कागदपत्र बनवून ती खरी असल्याप्रमाणे वापरली आणि बोगस व्यक्ति खरे असल्याचे भासवले तसेच बोगस खरेदी विक्री करारपत्र




बनवून जमीन विलास भगवान पाटील, विकी मनोहर लदगे यांना विकली. याप्रकरणी विलास पाटील, विकी लदगे आणि खरेदी खतावरील साक्षीदार गणेश अनंता शेळके, कैलास बाळू विरळे आणि अनोळखी दोन व्यक्ती व इतर यांनी फिर्यादी यांची फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला.

# पत्नीने गुप्तांगावर केले चाकूने वार

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी :** पत्नीने पतीच्या गुप्तांगावर चाकूने वार करून त्याला जखमी केले आणि सासूच्या तोंडावर गरम पाणी ओतून त्यांना देखील जखमी केले आणि ती घरातून चाकूसह पळून गेली. या प्रकरणी पत्नी विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात 20 मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. यातील पती हे रिक्षा चालक असून ते त्यांच्या घराच्या बेडरूम मध्ये झोपले असताना त्यांच्या पत्नीने मागील भांडणाचा राग मनात धरून पतीच्या गुप्तांगावर चाकूने वार केले तसेच सासूच्या तोंडावर गरम पाणी ओतून ओतले. यात पती



आणि सासू दोघेही जखमी झाले आहेत. त्यानंतर पत्नी चाकूसह घरातून पळून गेली. दोघांवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी तळोजा पोलीस अधिक तपास करत आहेत.

# संपत्ती स्थानिकांची, तुंबड्या भरल्या अधिकाऱ्यांनी भ्रष्टाचाराला रोखण्यासाठी जागे व्हा

## लाचखोर मंडल अधिकारी प्रकरणातील तक्रारदार निलेश पाटील यांचे आवाहन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** पनवेल शहरातील पर्डी क्रमांक 74 अ या 4.22 गुंठे जमिन मालकाचे नाव सातबाऱ्यावर चढविण्यासाठी तब्बल 1 लाख रूपयांची लाच मागणारा गजाआड झाला. पनवेल पंचायत समितीचे माजी सदस्य निलेश पाटील यांच्या तक्रारीमुळे लाचखोरीचा भस्म्या झालेला मंडल अधिकारी गोवर्धन माने 30 हजाराची लाच घेताना रंगेहाथ पकडला. परंतू केवळ महसूल विभागात हा भ्रष्टाचार नाही तर पनवेल तालुक्यातील सर्वच शासकीय यंत्रणा भ्रष्टाचाराने बरबटलेली आहे. महानगरपालिका, सिडको, अप्पर तहसिलदार, पनवेल भूमिअभिलेख, प्रांत, सब रजिस्टार ऑफिस आदी कार्यालये भ्रष्टाचाराने पोखरलेली आहेत. पनवेल तालुक्यातील बापजाद्यांच्या कमाईतून मिळवलेल्या जमिनीवर सरकारी अधिकाऱ्यांचा डोळा असून शेकडो अधिकाऱ्यांनी सोन्याच्या तुंबड्या भरल्या आहेत. काम फुकट करण्याची जबाबदारी असलेले अधिकारी प्रत्येक काम पैसे घेतल्याशिवाय काम करीत नाहीत असा आरोप निलेश पाटील यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत केला. आमच्या हक्काच्या कामासाठी पैसे का द्यायचे असा प्रश्न विचारल्याशिवाय गोरगरीब शेतकऱ्यांची कामे होणार नाहीत. पैशासाठी कोणाचे काम अडविले जाणार असेल तर माझ्याशी संपर्क साधा मी न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करेन आवाहन निलेश पाटील यांनी केले.

सातबारावर नाव नोंदविण्यासाठी निलेश पाटील यांनी पनवेलच्या तहसिलदार मिनल भामरे यांनी नोव्हेंबर 2025 रोजी अर्ज केला होता. डिसेंबर किंवा जानेवारीत हे काम पुर्ण होणे अपेक्षित होते. परंतू संबंधित जागेची किंमत कोट्यवधी रूपये आहे, त्यामुळे याकामासाठी 1 लाख रूपये लागतील अशी मागणी केली. माझी प्रॉपर्टी किती कोटींची आहे, यांच्याशी मंडल अधिकारी गोवर्धन माने यांचा काय संबंध असा प्रश्न उपस्थित करून पैसे देण्यास निलेश पाटील यांनी नकार दिला. पैसे देण्यास नकार दिल्यामुळे माने याने थम्ब इंप्रेशनचे काम जाणिवपुर्वक रखडविले. अखेर तड़जोडीअंती सुरूवातीला 50 हजार आणि 30 हजारात माने काम करण्यास तयार झाला. त्यामुळे रायगड लाचलुचपत विभागाने लावलेल्या सापळयात माने अडकला. सरकारी कार्यालयात सर्वसामान्य नागरिकांची पिळवणूक करण्याचा हा प्रकार पनवेलमध्ये नवीन नाही. पनवेल तालुका म्हणजे सरकारी अधिकाऱ्यांसाठी अक्षरश सोन्याचे अंडे देणारी कोंबडी आहे. पनवेलमध्ये पोस्टिंग मिळवण्यासाठी कोट्यवधींची गुंतवणूक म्हणजेच वरिष्ठ कार्यालयाला पैसे द्यायचे, आणि पोस्टींगसाठी गुंतवलेली रक्कम दामदुप्पटपणे वसूल करण्यासाठी सर्वसामान्य नागरिकांची कामे अडवून भ्रष्टाचाराच्या मार्गाने वसूल करायची. यासाठी स्थानिक जमिनदार, वारसदारांची पिळवणूक सुरू आहे. यामुळे पनवेलमधील जमीनमालक हतबल झाला आहे. अनेक गरीब शेतकऱ्यांची कामे लाच देण्यासाठी पैसे नसल्यामुळे अडकलेली आहेत. विकासकामांच्या नावाखाली कमिशनखोरी, परवानग्यांसाठी दलाली, फाईल हलवण्यासाठी पैशांची मागणी आणि कंत्राटांमधील गैरव्यवहार यामुळे प्रशासनावरील विश्वास ढासळत चालला आहे. झपाट्याने वाढणाऱ्या विकासाचा फायदा स्थानिकांना मिळण्याऐवजी भ्रष्ट अधिकारी, कर्मचाऱ्यांना होतो आहे. सामान्य नागरिक मात्र कर भरून, सरकारी शुल्क भरून आणि हेलपाटे मारून थकला आहे.

पनवेलमधील एकही सरकारी कार्यालय याला अपवाद नाही. उलट इतर तालुक्यांपेक्षा पनवेल, उरण आणि आसपासच्या तालुक्यातील विकासामुळे लाचेचा दर देखील चढा आहे. याला आळा घालायचा असेल तर सर्वसामान्य नागरिकांनी जागे होण्याची गरज आहे.

पैसे मागणाऱ्या अधिकाऱ्यांविरोधात आवाज उठवून संबंधितांना धडा शिकवल्याशिवाय हे थांबणार नाही. मी पनवेलचे आमदार प्रशांतदादा ठाकूर आणि आमदार विक्रांतदादा पाटील यांची भेट घेवून याबाबत ठोस पावले उचलण्याची मागणी करणार असल्याचे निलेश पाटील यांनी सांगितले. नागरिकांना सरकारी कार्यालयातील कामकाजात काही अडथळे आल्यास माझ्याशी 9867779777 या मोबाईलवर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले.

# मराठवाडा : दुष्काळ, टँकर आणि उद्ध्वस्त शेतकरी

'मराठवाडा' महाराष्ट्राच्या नकाशावरचा एक मोठा प्रदेश , पण विकासाच्या प्रवाहात कायम उपेक्षित राहिलेला. संतांची भूमी, कष्टकरी माणसांची भूमी आणि संघर्षाची भूमी म्हणून ओळख असलेल्या या प्रदेशासमोर आज पाणीटंचाई, बेरोजगारी, कर्जबाजारीपणा आणि शेतकरी आत्महत्यांचे अभूतपूर्व संकट उभे आहे. एकीकडे निसर्गाची अवकृपा तर दुसरीकडे सरकारी उदासीनता, अपूर्ण सिंचन प्रकल्प आणि तुटपुंज्या मदतीच्या योजना यामुळे ग्रामीण जीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. हजारो कोटींच्या घोषणा झाल्या, नदीजोड प्रकल्पांचे भूमिपूजन झाले, दुष्काळमुक्त मराठवाड्याची स्वप्ने दाखवली गेली; पण आजही अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी टँकर आणि शेतकऱ्याच्या डोळयात अश्रू हेच वास्तव दिसते.

मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांमध्ये वारंवार दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण होत असते. राज्य शासनाच्या विविध अहवालांनुसार मराठवाड्यातील सिंचनक्षमता राज्याच्या सरासरीपेक्षा खूपच कमी आहे. काही भागांमध्ये ती १५ ते १८ टक्क्यांच्या आसपास असल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे येथील बहुतांश शेती अजूनही पूर्णपणे पावसावर अवलंबून आहे. पाऊस वेळेवर झाला तरच शेतकऱ्याच्या घरात दिवा लागतो; अन्यथा खरीप हातचा जातो, रब्बीची आशा संपते आणि कर्जाचा डोंगर वाढतो.

या संपूर्ण संकटामध्ये बीड जिल्ह्याची परिस्थिती सर्वाधिक गंभीर मानली जाते. राज्यातील सर्वाधिक दुष्काळग्रस्त जिल्ह्यांमध्ये बीडचा वारंवार उल्लेख होतो. अनियमित पाऊस, अत्यल्प सिंचनक्षमता आणि भूजल पातळीतील मोठी घट यामुळे जिल्ह्यातील शेती पूर्णपणे अस्थिर बनली आहे. जिल्ह्यातील गेवराई, माजलगाव, अंबाजोगाई, परळी, धारूर, केज, पाटोदा आणि शिरूर कासार हे तालुके दरवर्षी तीव्र जलटंचाईचा सामना करत आहेत. अनेक गावांमध्ये उन्हाळयात विहिरी आणि बोअरवेल पूर्णपणे कोरड्या पडतात.

दुष्काळी परिस्थितीची भीषणता टँकरच्या आकडेवारीवरून स्पष्ट होते. २०१६ च्या तीव्र दुष्काळात मराठवाड्यात हजारो गावे टँकरवर अवलंबून होती. काही काळात संपूर्ण मराठवाड्यात ४,००० ते ६,००० पेक्षा अधिक टँकर सुरू



असल्याची सरकारी नोंद होती. बीड जिल्ह्यात शेकडो गावांना टँकरने पाणीपुरवठा करण्यात आला. काही गावांमध्ये आठवड्यातून एकदाच पाणी मिळत होते. महिलांना आणि लहान मुलींना मैलोनमैल पायपीट करून पाणी आणावे लागत होते. पाण्यासाठी वाद, भांडणे आणि संघर्षाची परिस्थिती अनेक भागांत निर्माण झाली होती.बीड जिल्ह्यातील शेतकरी आत्महत्यांची आकडेवारीही अत्यंत धक्कादायक आहे. अधिकृत सरकारी नोंदींनुसार मागील काही महिन्यांतच जिल्ह्यात २०० पेक्षा अधिक शेतकरी आत्महत्यांची नोंद झाली होती. संपूर्ण मराठवाड्यात दरवर्षी शेकडो शेतकरी आत्महत्या करतात. बीड, धाराशिव, लातूर, परभणी, नांदेड आणि जालना हे जिल्हे सातत्याने आत्महत्यांच्या यादीत वर राहिले आहेत. पिकांचे नुकसान, हमीभावाचा अभाव, वाढलेले उत्पादन खर्च, बँकांचे आणि खासगी सावकारांचे कर्ज, पीकविम्याचा विलंब आणि पाण्याची असुरक्षितता या सर्वांनी शेतकरी मानसिकदृष्ट्या खचला आहे. आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांच्या मागे उद्ध्वस्त कुटुंबे, अनाथ झालेली मुले आणि कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या विधवा स्त्रिया उभ्या आहेत.

बीड जिल्ह्यातील आणखी एक गंभीर वास्तव म्हणजे ऊसतोड मजुरांचे स्थलांतर. दरवर्षी लाखो मजूर मराठवाड्यातून पश्चिम महाराष्ट्र आणि कर्नाटकात ऊसतोडीसाठी स्थलांतरित होतात. त्यामध्ये बीड जिल्ह्याचा वाटा मोठा आहे. अनेक कुटुंबे सहा-सहा महिने गावापासून दूर राहतात. लहान मुलांचे शिक्षण अर्धवट राहते, महिलांना असुरक्षित परिस्थितीत काम करावे लागते आणि अनेक कुटुंबांचे सामाजिक आयुष्य विस्कळीत होते. दुष्काळ आणि बेरोजगारीमुळे स्थलांतर हा अनेकांसाठी जगण्याचा पर्याय बनला आहे.

दुष्काळामुळे चारा टंचाईचे संकटही वारंवार निर्माण होते. २०१६ च्या तीव्र दुष्काळात मराठवाड्यात शेकडो चारा छावण्या सुरू करण्यात आल्या होत्या. हजारो जनावरे त्या छावण्यांमध्ये ठेवण्यात आली. बीड जिल्ह्यातही मोठ्या प्रमाणावर छावण्या उभाराव्या लागल्या. अनेक शेतकरी स्वतः उपाशी राहिले, पण जनावरे वाचवण्यासाठी संघर्ष करत राहिले. मात्र अनेकदा छावण्यांना निधी उशिरा मिळणे, अपुऱ्या सुविधा आणि व्यवस्थापनातील त्रुटी याबाबत तक्रारी समोर आल्या.

या संकटातून मार्ग काढण्यासाठी गोदावरी–सिंदफना, वैनगंगा–पैनगंगा, नार-पार–गोदावरी, दमणगंगा–गोदावरी अशा नदीजोड योजनांची घोषणा करण्यात आली. मराठवाड्यासाठी अंदाजे १६८ TMC पर्यंत अतिरिक्त पाणी उपलब्ध होऊ शकते, असा दावा विविध समित्या आणि अभ्यासकांनी केला. बीड जिल्ह्यासाठी विशेषतः गोदावरी–सिंदफना प्रकल्प महत्त्वाचा मानला जातो. या योजनांमुळे लाखो हेक्टर जमीन सिंचनाखाली येईल, भूजल पातळी वाढेल आणि टँकरमुक्त गावे तयार होतील, असे सांगण्यात आले. मात्र प्रत्यक्षात अनेक योजना अजूनही फाईलमध्येच अडकलेल्या दिसतात.

सरकारी घोषणांचा गाजावाजा मोठा असतो; पण प्रत्यक्ष मदत अत्यंत तुटपुंजी असते, अशी भावना ग्रामीण भागात तीव्र आहे. कर्जमाफीच्या घोषणा होतात; पण अनेक शेतकरी पात्र असूनही वंचित राहतात. नुकसानभरपाई जाहीर होते; पण मिळणारी रक्कम उत्पादन खर्चाच्या तुलनेत अत्यल्प असते. काही हजार रुपयांच्या मदतीने लाखोंचे नुकसान भरून निघत नाही. पीकविमा योजनांमध्येही अनेक तक्रारी समोर आल्या. नुकसान झाले तरी विमा वेळेवर मिळत नाही, पंचनामे उशिरा होतात आणि शेतकरी पुन्हा कर्जाच्या गर्तेत अडकतो. ग्रामीण बेरोजगारी ही आणखी एक गंभीर समस्या बनली आहे. लाखो युवक शिक्षण पूर्ण करून गावात परततात; पण रोजगार उपलब्ध नसतो. उद्योगधंदे नाहीत, प्रक्रिया उद्योग नाहीत आणि शेतीतही स्थैर्य नाही. परिणामी मोठ्या प्रमाणावर स्थलांतर वाढले आहे. अनेक युवक शहरांकडे मजुरीसाठी जात आहेत. याचाच परिणाम शेतकरी तरुणांच्या विवाहांवरही होत आहे. आज अनेक गावांमध्ये शेती करणाऱ्या मुलांचे लग्न जुळणे कठीण झाले आहे. दुष्काळ, कर्ज आणि अस्थिर भविष्य पाहून अनेक कुटुंबे शेतकरी मुलांना नकार देतात.

आज मराठवाड्याची परिस्थिती ही केवळ नैसर्गिक संकटाची कहाणी नाही; तर ती व्यवस्थात्मक अपयशाची जिवंत साक्ष आहे. शेतकरी आत्महत्या, हजारो टँकर, चारा छावण्या, बेरोजगार तरुण, लग्नासाठी नकार मिळणारे शेतकरी तरुण आणि कर्जाच्या ओझ्याखाली दबलेली कुटुंबे हे सर्व चित्र महाराष्ट्राच्या विकास मॉडेलवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करते. जर खरंच मराठवाडा बदलायचा असेल, तर घोषणांपेक्षा कृतीला प्राधान्य द्यावे लागेल. नदीजोड प्रकल्प, शाश्वत सिंचन, ग्रामीण उद्योग, रोजगारनिर्मिती, पारदर्शक मदत व्यवस्था आणि शेतकऱ्याला केंद्रस्थानी ठेवणारे धोरण याशिवाय पर्याय नाही. अन्यथा प्रत्येक वर्षी नवे आश्वासन मिळेल, नवी घोषणा होईल; पण मराठवाड्याच्या डोळयातील पाण्याची प्रतीक्षा कायम राहील.

**- भरत पवार**

# कॅन्सरचा धोका कमी करण्यात 'व्हिटॅमिन सी' ठरतंय प्रभावी? नवीन संशोधन काय सांगतं?


आंबट गोड चवीची आणि पिवळया केशरी रंगाची संत्री सगळयांच्याच आवडीची असतात. सर्दी झाल्यावर संत्री खाल्ल्याने आरोग्यात झपाट्याने सुधारणा होते, असा अनेकांचा समज आहे. मात्र, याच संत्रीचा संबंध आता थेट कर्करोगावरील प्रभावी उपचारासाठी जोडण्यात आला आहे. कॅनडातील वॉटरलू विद्यापीठातील संशोधकांनी केलेल्या एका नव्या अभ्यासात संत्र्यांमध्ये आढळणारे 'व्हिटॅमिन सी' पचनसंस्थेशी संबंधित कर्करोगाचा धोका कसा कमी करू शकते, याचे विश्लेषण करण्यात आले आहे. या संशोधनाचे निष्कर्ष 'जर्नल ऑफ थिअरेटिकल बायोलॉजी' या नियतकालिकात प्रकाशित करण्यात आले आहेत, त्याविषयी...

**कर्करोगग्रस्त रुग्णांच्या संख्येत मोठी वाढ**

बदलती जीवनशैली आणि चुकीच्या सवयींमुळे कर्करोगाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच चालले आहे. दरवर्षी जगभरात एक कोटीहून अधिक लोकांचा कर्करोगाने मृत्यू होत असल्याची बाब उघड झाली आहे. भारतातही या जीवघेण्या आजाराचे प्रमाण वाढत असल्याने चिंता व्यक्त केली जात आहे. २०२५ च्या अखेरीस प्रत्येकी पाचपैकी एका पुरुषाला आणि सहापैकी एका महिलेला कर्करोगाची लागण होणार असल्याचा अंदाज 'इंटरनॅशनल एजन्सी फॉर रिसर्च ऑन कॅन्सर' या संस्थेने वर्तवला होता. त्यांचा हा अंदाज खरा ठरला असून, कित्येकांना कर्करोगाची लागण झाल्याचे समोर आले आहे. भारतात दर दोन मिनिटांना तीन लोकांचा कर्करोगाने मृत्यू होत असल्याची धक्कादायक बाब आकडेवारीतून समोर आली आहे. भविष्यात हा आकडा आणखीनच वाढणार असल्याची भीती काही अहवालांमधून व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे या जीवघेण्या आजारावर प्रभावी उपचारासाठी अनेक देशांत संशोधन सुरू आहे.

**'व्हिटॅमिन सी' म्हणजे काय?**

'व्हिटॅमिन सी' हे पाण्यात विरघळणारे जीवनसत्त्व असून ते शरीराच्या एकंदरीत आरोग्यासाठी आणि कार्यक्षमतेसाठी अत्यंत महत्वाचे मानले जाते. हे सूक्ष्म पोषक शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यास, संसर्गाशी लढण्यास आणि त्वचा, रक्तवाहिन्या, हाडे निरोगी ठेवण्यास मदत करते. मानवी शरीरात 'व्हिटॅमिन सी' आपोआप तयार होत नाही आणि



ते साठवूनही ठेवता येत नाही. त्यामुळे संत्री, मोसंबी यांसारखी फळे आणि बेरी, टोमॅटो, हिरव्या पालेभाज्या किंवा पूरक आहारातून ते मिळवावे लागते. यादरम्यान वॉटरलू विद्यापीठातील संशोधकांनी एका गणितीय तंत्राचा वापर करून 'व्हिटॅमिन सी' पचनसंस्थेतील कर्करोगाला कारणीभूत ठरणाऱ्या रासायनिक प्रक्रियांवर कसा प्रभाव पाडते, याचा सखोल अभ्यास केला आहे.

**कॅन्सरचा धोका कसा कमी होऊ शकतो?**

गेल्या काही दशकांत उत्तर अमेरिकेतील नागरिकांच्या शरीरात प्रक्रिया केलेल्या अन्नातील नायट्रेट्स आणि नायट्राइट्सचे प्रमाण वाढले आहे. हे घटक प्रक्रिया केलेल्या मांसासह प्रदूषित माती आणि पाण्यात पिकवलेल्या फळे व भाज्यांमध्ये आढळून येतात. वास्तविक पाहता नायट्रेट्स आणि नायट्राइट्स हे मज्जासंस्था आणि हृदयाच्या आरोग्यासाठी महत्त्वाचे असले तरी पोटामध्ये त्यांच्यावर 'नायट्रोसेशन' नावाची रासायनिक प्रक्रिया होते. या प्रक्रियेत तयार होणारी काही संयुगे कर्करोगाचा धोका वाढवू शकतात, असा अनेक वैज्ञानिकांचा संशय आहे. "१९९० च्या दशकापासून अनेक संशोकांकडून या संयुगांचा आणि कर्करोगाचा संबंध तपासला जात आहे. मात्र, त्याचे निष्कर्ष नेहमीच परस्परविरोधी आले आहेत. आमच्या संशोधनानुसार, आहारातील 'व्हिटॅमिन सी'च्या उपस्थितीमुळे या निकालांमधील विसंगती स्पष्ट होण्यास मदत होऊ शकते," असे या संशोधनाचे प्रमुख डॉ. गॉर्डन मॅकनिकोल यांनी सांगितले.

**संशोधकांनी कसे लावले निष्कर्ष?**

या संबंधाचा अभ्यास करण्यासाठी संशोधकांनी लाळग्रंथी, पोट, लहान आतडे आणि रक्तातील प्लाझ्मा यांचे गणितीय मॉडेल तयार केले. त्यानंतर नायट्राइट्स आणि नायट्रेट्स शरीरात कसे फिरतात आणि कालांतराने त्यांच्यात कसे बदल होतात, यावर संशोधन करण्यात आले. अभ्यासादरम्यान असे आढळले की, पालकसारख्या हिरव्या पालेभाज्यांमध्ये 'व्हिटॅमिन सी' आणि 'नायट्रेट' दोन्ही असतात. अशा भाज्यांच्या सेवनाने कर्करोगाचा धोका झपाट्याने कमी होऊ शकतो. या संशोधनात असेही दिसून आले की- प्रत्येक जेवणानंतर व्हिटॅमिन सी सप्लिमेंट घेतल्यास नायट्रोसेशनमधून तयार होणाऱ्या आणि कर्करोगाच्या धोक्याशी संबंधित संयुगांची निर्मिती काही प्रमाणात कमी होऊ शकते.

विशेषतः बेकन आणि सलामीसारख्या पदार्थांमधील नायट्राइट्स व नायट्रेट्समुळे निर्माण होणारा धोका कमी करण्यास त्याचा फायदा मोठा होऊ शकतो.

**भविष्यातील संशोधनासाठी होणार मदत**

"वॉटरलू विद्यापीठातील संशोधकांनी केलेले हे संशोधन भविष्यातील क्लिनिकल आणि प्रयोगशाळेतील अभ्यासांसाठी एक वैज्ञानिक मार्गदर्शक ठरू शकते.

याद्वारे नायट्राइटचे शरीरातील प्रमाण, अँटी-ऑक्सिडंट्सचे सेवन, जेवणाची वेळ, पोटातील आरोग्यविषयक स्थिती आणि तोंडातील सूक्ष्मजीवांची सक्रियता, अशा संभाव्य घातक रासायनिक प्रक्रियांना कारणीभूत ठरणाऱ्या महत्त्वाच्या घटकांची ओळख पटवण्यात आली आहे.

भविष्यात हा अभ्यास संशोधकांना अधिक अचूक प्रयोग आणि उपाययोजना आखण्यास मदत करेल; तसेच नायट्रोसेशनची प्रक्रिया नेमकीकधी आणि कोणामध्ये होण्याची शक्यता सर्वाधिक आहे, यावर लक्ष केंद्रित करणे यामुळे सोपे होईल, अशी माहिती या अभ्यासाच्या सह-लेखिका डॉ. अनिता लेटन यांनी दिली आहे.

# अन्नसुरक्षेसाठी अनुवांशिक अडथळे तोडण्याकरिता, संकरित गव्हासाठी हरितक्रांती!









स्वातंत्र्यानंतर, भारताला अन्नधान्याची तीव्र टंचाई भेडसावत असताना प्रमुखत: धान्य आयातीवर अवलंबून राहावं लागत होतं. तसेच PL४८० सारख्या योजनांतर्गत विशेष व्यवस्थेद्वारे, देशानं आपल्या वाढत्या लोकसंख्येला अन्न पुरविण्यासाठी संघर्ष केला. एम. एस. स्वामीनाथन आणि नॉर्मन बोरलॉग यांसारख्या शास्त्रज्ञांच्या नेतृत्वानं हरित क्रांतीदरम्यान गव्हाच्या उच्च-उत्पादक वाण आणून आमूलाग्र बदल घडवून आणला.

सुधारित गव्हाचे अनुवांशिकता, सिंचन विस्तार, खते आणि शेतीच्या चांगल्या पद्धती यांचा मिश्र करण्यात आलं. भारतानं अन्नधान्याची कमतरतेवर मात करत गव्हाच्या उत्पादनात स्वयंपूर्ण देश म्हणून ओळख निर्माण केली.

पिकाचं उत्पादन हे देशाचं नशीब बदलू शकते, हे हरितक्रांतीनं दाखवून दिलं. गव्हाचे उत्पादन खूप वाढल्यानं लाखो लोकांना अन्नसुरक्षा मिळाली. मात्र, आज जगासमोर एक नवीन आव्हान आहे. जागतिक लोकसंख्या सतत वाढत आहे. हवामानातील बदलामुळे अंदाज करणं अशक्य होईल, अशी हवामानाची स्थिती निर्माण होत आहे. शहरीकरण आणि पर्यावरणाच्या ऱ्हासामुळे शेतजमीन कमी होत आहे. शेतकऱ्यांनी प्रतिकूल परिस्थिती असताना कमी जमिनीतून जास्त अन्न उत्पादन केले पाहिजे.

जीनोमिक्स, अचूक पीक उत्पादन आणि नवीन संकरित प्रणालींसह आधुनिक कृषी जैवतंत्रज्ञान हे जागतिक अन्न मागणी पूर्ण करण्यासाठी भविष्यासाठी प्रमुख साधन म्हणून उदयास आलं. संकरित गव्हाचा विकास हे सर्वात मोठे वैज्ञानिक आव्हान आहे. त्याबाबत संशोधक अनेक दशकांपासून प्रयत्न करत आहेत. आता, एक मोठी प्रगती एक महत्त्वपूर्ण वळणावर पोहोचली आहे.

हायब्रीड पिके कशामुळे महत्त्वाची आहेत?- संकरित पिके दोन अनुवांशिकदृष्ट्या भिन्न मूळ वनस्पतींना ओलांडून तयार केली जातात. पहिली पिढी (ज्याला F१ हायब्रीड म्हणतात) अनेकदा "हायब्रिड जोम" असते. याचा अर्थ, उच्च उत्पन्न, मजबूत वाढ, उत्तम रोग प्रतिकारशक्ती, सुधारित ताण सहनशीलता इत्यादी असते. संकरित मकामुळे (कॉर्न) २०व्या शतकात जागतिक शेतीमध्ये क्रांती घडवून आणली. शेतकऱ्यांनी त्वरीत त्याचा अवलंब केल्यानं खूप म्हणजे अनेकदा २०-३०% किंवा त्याहून अधिक उत्पादन वाढले. गव्हाच्याबाबतीच शास्त्रज्ञांना तीच आशा होत. प्रत्यक्षात गहू हा त्यांच्यासाठी आव्हानात्मक ठरला.

कॉम्प्लेक्स जेनेटिक्स हे गव्हाच्या संशोधनात मुख्य आव्हान- गहू अनुवांशिकदृष्ट्या गुंतागुंतीचा आहे. आधुनिक ब्रेड व्हीटमध्ये (ट्रिटिकम एस्टिव्हम) गुणसूत्रांचे सहा संच असतात. त्याला वैज्ञानिकदृष्ट्या 'हेक्साप्लॉइड' म्हणतात. सोप्या भाषेत, गहू एका वनस्पतीमध्ये एकत्रित तीन समान असलेले, मात्र, थोडे वेगळे जीनोम (गुणसूत्रे) वाहून नेतो. यामुळे अनेक समस्या निर्माण होतात. अनेक जीन्स अनेक वाणांमध्ये अस्तित्वात आहेत. गुणधर्म कसे एकत्र होतील, हे सांगणं कठीण आहे. काही जनुके संपू शकतात किंवा इतरांना कमकुवत करू शकतात. गव्हासोबत काम करताना प्रजननकर्त्यांना याचाच सामना करावा लागला. तर, मक्यासारख्या सोप्या पिकांमध्ये, अनुवांशिक व्यवस्थापन करणं सोपं आहे. गव्हात, जटिलतेमुळे संकरित झाडे सातत्यपूर्ण कामगिरी करणार नाहीत, असा धोका निर्माण होतो.

गव्हातील स्व-परागकण हा आणखी एक अडथळा - मक्याच्या विपरीत, गहू नैसर्गिकरित्या स्व-परागकण करतो. त्याच्या फुलांची रचना सामान्यतः फूल उघडण्यापूर्वीच फलन होते, अशी रचना आहे. यामुळे क्रॉस-परागीकरण दुर्मिळ होते. संकरित गहू तयार करण्यासाठी, प्रजननकर्त्यांनी, मादी पालकांना परागकण (पुरुष वंध्यत्व) तयार करण्यापासून प्रतिबंधित करणं आवश्यक असते. निवडलेल्या पुरुष पालकांकडून परागकण त्याची सुपिकता आहे, याची खात्री करणे. फुलांच्या वेळेस अचूकपणे समक्रमित करणं आवश्यक आहे. ही प्रक्रिया तांत्रिकदृष्ट्या कठीण आणि खर्चिक आहे. अगदी लहान चुकांमुळेही नॉन-हायब्रीड बियाणे येऊ शकतात.

अर्थशास्त्र समस्या- संकरित गव्हाच्या झाडांसाठी प्रति हेक्टर मोठ्या प्रमाणात बियाणे आवश्यक आहे. संकरित बियाणे उत्पादन महाग होते. उत्पन्नातून मिळणारा नफा अनेकदा माफक . (५-१५%) होतो. बियाण्यांच्या वाढीव किमतीचा फायदा आहे की नाही, याबाबत शेतकरी संभ्रावस्थेत असतो. त्यामुळे अनेक दशकांपासून संकरित गहू व्यावसायिक पातळीवर पोहोचू शकला नाही.

प्रजनन आणि स्थिरता समस्या- गव्हामध्ये सहा गुणसूत्र संच असल्यानं पुनरुत्पादनादरम्यान जोडणी पूर्णपणे संतुलित असणं आवश्यक आहे. जेव्हा प्रजननकर्ते दोन भिन्न गव्हाच्या रेषा ओलांडतात तेव्हा गुणसूत्र योग्यरित्या संरेखित करू शकत नाहीत. प्रजनन क्षमता कमी होऊ शकते, धान्य उत्पादन कमी होऊ शकते किंवा वातावरणात भिन्न असू शकते. संकरित प्रणाली यशस्वी होण्यासाठी, ती वेगवेगळ्या हवामानात आणि मातीत वर्षानुवर्षे स्थिर असणं आवश्यक आहे. ही स्थिरता सर्वात मोठ्या वैज्ञानिक अडथळ्यांपैकी एक आहे.

एक्स-टेरा हायब्रिड गहू - एक प्रगती- Syngenta ने २०२६ मध्ये घोषित केलं की, त्याचे संकरित गहू प्लॅटफॉर्म, X-TERRA, फ्रान्समध्ये अधिकृतपणे नोंदणीकृत झाले आहेत. ही युरोपमधील पहिल्या व्यावसायिक संकरित गहू प्रणालींपैकी एक आहे. कंपनी युनायटेड किंगडम आणि इतर युरोपियन देशांमध्ये विस्ताराची तयारी करत आहे.

**एक्स-टेरा -**

१. आधुनिक जीनोमिक साधने: आजचे ब्रीडर्स प्रगत DNA तंत्रज्ञान वापरून संपूर्ण गहू जीनोम स्कॅन करू शकतात. हे त्यांना महत्त्वाची जीन्स जलद ओळखण्यास, कोणते पालक चांगले एकत्र करतील याचा अंदाज लावू शकतात. तसेच चाचणी आणि प्रजनन कमी करू शकतात.

२. सुधारित पुरुष (male) वंध्यत्व प्रणाली: कार्यक्षम संकरित उत्पादनासाठी विश्वसनीय पुरुष वंध्यत्व प्रणाली आवश्यक आहे. Syngenta ने सुधारित प्रणाली विकसित केल्या आहेत. त्या स्वयं-परागण कमी करतात, संकरित बियाण्याची शुद्धता वाढवतात आणि उत्पादन कार्यक्षमता सुधारतात. त्यामुळे बियाणे उत्पादन खर्च कमी होण्यास मदत होते.

३. उत्पन्नाच्या स्थिरतेवर लक्ष केंद्रित करा: केवळ जास्तीत जास्त उत्पादनाऐवजी X-Terra संकरित ऋतूंमध्ये सातत्यपूर्ण उत्पन्न, मजबूत मुळांचा विकास, रोग प्रतिकारशक्ती आणि पर्यावरणीय ताणात टिकविण्यावर भर देण्यात येतो. हे हवामान बदलामुळे दुष्काळ, उष्णतेच्या लाटा आणि अनियमित पर्जन्यमान वाढत असताना महत्त्वाचं आहे.

हायब्रीड गहू खूप महत्त्वाचा - आजची जगभरातील स्थिती १९६०च्या दशकापेक्षा वेगळी आहे. हरितक्रांतीच्या काळात, विस्तारीत सिंचन आणि खतांचा वापर यांचा उत्पादन वाढविण्यात मोठा सहभाग राहिलेला आहे. आज जलस्रोत मर्यादित असताना खतांचा खर्च वाढला आहे. हवामानातील परिवर्तनशीलता वाढत आहे. तर दुसरीकडं शेतीयोग्य जमीन कमी होत आहे. अशा परिस्थितीत कृषी जैवतंत्रज्ञानानं आता शाश्वत आणि कार्यक्षम नफा मिळवून दिला पाहिजे. संकरित गव्हाचा वापर कार्यक्षमता सुधारणे, मूळ प्रणाली मजबूत करणे, ताण सहनशीलता वाढवणे आणि अप्रत्याशित हवामानात उत्पादन स्थिर करणे यासाठी फायदेशीर ठरू शकतो. ज्याप्रमाणे सुधारित गव्हाच्या जातींनी भारताला अनेक दशकांपूर्वी अन्न स्वयंपूर्णता प्राप्त करण्यास मदत केली होती, त्याचप्रमाणे नवीन प्रजनन तंत्रज्ञान जगाला भविष्यातील अन्नाची मागणी पूर्ण करण्यास मदत करू शकते.

**काय आहेत आणखी आव्हाने-** जरी X-Terra मोठ्या प्रगतीचे प्रतिनिधित्व करत असले तरी, खालीलपैकी काही प्रश्न अनुत्तरित आहेत.

संकरित गहू सर्वोत्तम पारंपरिक वाणांना सातत्यानं मागे टाकतील का?

बियाणे खर्च स्पर्धात्मक राहू शकतात?

जास्त उष्ण किंवा कोरड्या प्रदेशात संकरीत वाण कसे कार्य करतील?

संकरित प्रणाली आशिया आणि आफ्रिकेसह जागतिक स्तरावर मापन करू शकतात?

संकरित गहू ताबडतोब पारंपारिक वाण बदलू शकत नाहीत. परंतु, तो एक नवीन मार्ग उघडतो. तसेच उत्पादनाची स्थिरता सुधारू शकतो. लवचिकता वाढवू शकतो. जगातील सर्वात महत्त्वाच्या मुख्य पिकांपैकी एकाचे भविष्य सुरक्षित करण्यात मदत करू शकतो. हरित क्रांतीपासून ते जीनोमिक्स- सहाय्यित प्रजननापर्यंत, गव्हामधील बदल सुरूच आहेत. पुढील दशकांमध्ये मानव स्वतःला किती यशस्वीरित्या आहार देईल, हे वनस्पती विज्ञान ठरवेल.

**- आप्पा राव पोडीले**

## कळंबोली सर्कल उड्डाणपुलाचे काम प्रगतीपथावर; सप्टेंबर अखेरपर्यंत महत्त्वाचा टप्पा पूर्ण होणार

### वाहतूक सुरळीत ठेवत कळंबोली सर्कलवरील उड्डाणपूल उभारणीला वेग, नियोजनबद्ध कामामुळे प्रकल्प अंतिम टप्प्याकडे

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी** : सायन पनवेल मार्गावरील कळंबोली सर्कल येथे सुरू असलेल्या उड्डाणपुलाच्या कामाला वेग आला असून प्रकल्प नियोजनबद्ध पद्धतीने पुढे सरकत आहे. या प्रकल्पातील विविध टप्पे वेळेत पूर्ण करण्यासाठी विशेष प्रयत्न सुरू आहेत. सध्या आर्म-३ विभागातील डेक स्लॅबचे काम पूर्ण झाले असून उर्वरित भागातही काम जलदगतीने सुरू आहे. आर्म-५ आणि आर्म-६ या जंक्शनच्या (महत्त्वाच्या जोडणाऱ्या भागाच्या) कामाला प्राधान्य देण्यात आले आहे, कारण हा प्रकल्पातील 'क्रिटिकल स्पॅन' मानला जातो. अधिकाऱ्यांच्या मते, हा भाग सप्टेंबर अखेरपर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.







कामाच्या प्रगतीसोबत वाहतूक व्यवस्थापनालाही विशेष महत्त्व दिले जात आहे. कळंबोली परिसरात काही प्रमाणात वाहतूक कोंडी होत असली तरी रॅम्प आणि डायव्हर्जनचे काम सुरू असल्याने परिस्थिती नियंत्रणात आहे. पर्यायी मार्गांची योग्य आखणी केल्यामुळे वाहनचालकांना मोठा त्रास होत नाही, अशी माहिती प्रकल्पाचे मॅनेजर हेड ऋषिकेश कोरडे यांनी दिली. आर्म-३ साठी एमजीएम समोरील डायव्हर्जन मार्गाचे कामही ३१ मेपर्यंत पूर्ण करण्याचा प्रयत्न सुरू आहे. या प्रकल्पाचे काम नियोजनानुसार आणि योग्य तांत्रिक पद्धतीने सुरू असल्याने येत्या काळात या उड्डाणपुलामुळे परिसरातील वाहतूक अधिक सुरळीत होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. उड्डाणपुलाचे बांधकाम विविध "आर्म्स"मध्ये (मार्ग/दिशा) विभागून केले जात आहे, ज्यामुळे प्रत्येक दिशेतील वाहतुकीचा ताण वेगवेगळ्या टप्प्यांमध्ये हाताळता येतो. आर्म-३ या भागातील डेक स्लॅबचे काम पूर्ण झाले आहे. हा टप्पा पूर्ण होणे म्हणजे उड्डाणपुलाच्या मुख्य रचनेतील एक मोठी प्रगती मानली जाते. आर्म-५ आणि आर्म-६ या दोन्ही आर्म्सचा जंक्शन भाग अत्यंत महत्त्वाचा असून, तो "क्रिटिकल स्पॅन" म्हणून ओळखला जातो. या भागातील काम सध्या प्राधान्याने सुरू आहे.

तांत्रिकदृष्ट्या गुंतागुंतीचा हा टप्पा असल्यामुळे येथे अधिक दक्षता घेतली जात आहे. अधिकाऱ्यांच्या अंदाजानुसार, हा भाग सप्टेंबर अखेरपर्यंत पूर्ण होऊ शकतो. काम सुरू असतानाही स्थानिक वाहतुकीवर कमीतकमी परिणाम होईल यासाठी विशेष नियोजन करण्यात आले आहे. कळंबोली परिसरात काही प्रमाणात वाहतूक कोंडी जाणवत असली तरी ती नियंत्रणात ठेवण्यात प्रशासनाला यश आले आहे. रॅम्पचे काम सध्या सुरू असून, ते पूर्ण झाल्यानंतर वाहतुकीची दिशा अधिक सुलभ होईल. डायव्हर्जन मार्गांची उभारणी टप्प्याटप्प्याने केली जात आहे, ज्यामुळे वाहनचालकांना पर्यायी मार्ग उपलब्ध होत आहेत. विशेष म्हणजे, काम सुरू असतानाही "ट्रॅफिक अनडिस्टर्ब्ड" ठेवण्यावर भर देण्यात आला आहे. आर्म-३ साठी आवश्यक डायव्हर्जन काम ३१ मेपर्यंत पूर्ण करण्याचे लक्ष्य आहे. उर्वरित आर्म्समधील संरचनात्मक काम (गर्डर, स्लॅब, सपोर्ट स्ट्रक्चर) टप्प्याटप्प्याने पूर्ण केले जाणार आहे. जंक्शन भाग पूर्ण झाल्यानंतर संपूर्ण उड्डाणपुलाच्या जोडणीचे काम वेगाने पूर्ण होण्याची शक्यता आहे. या उड्डाणपुलाच्या पूर्णत्वानंतर कळंबोली सर्कलवरील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## कर्जतच्या आगरी समाज सभागृहाचे आज महेंद्रशेठ घरत यांच्या हस्ते उदघाटन

**दैनिक युवक आधार**

**उलवा, प्रतिनिधी :** कर्जत तालुका आगरी समाज संघटनेच्या माध्यमातून बांधण्यात येत असलेल्या वातानुकूलित भव्य सभागृहाचे शनिवारी (ता. २३) सायंकाळी ५ वाजता आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांच्या हस्ते शानदार उदघाटन होणार आहे. या सभागृहाचे संपूर्ण अत्याधुनिक नूतनीकरण यमुना सामाजिक शैक्षणिक संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी सढळ हस्ते केलेल्या आर्थिक सहकार्याने होत आहे. या समारंभाला पनवेल महापालिकेचे महापौर नितीन पाटील,



बदलापूर नगराध्यक्षा रुचिता घोरपडे, अंबरनाथ नगरपालिकेचे उपनगराध्यक्ष सदानंद पाटील, प्रदीप पाटील, तसेच अन्य मान्यवर उपस्थित राहाणार आहेत. हा समारंभ हुतात्मा हिराजी गोमाजी पाटील सामाजिक सभागृह नेरळ-बोपेले येथे होणार आहे.

## डायमेड क्लिनिकचे महेंद्रशेठ घरत यांच्या हस्ते उदघाटन!

**दैनिक युवक आधार**

**उलवे, प्रतिनिधी :** खांदा कॉलनी येथील डायमेड क्लिनिकचे आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांच्या हस्ते गुरुवारी (ता. २१) उदघाटन करण्यात आले. यावेळी डॉ. अनुजा हिंगमिरे-पाटील, डॉ. राहुल पाटील, एम. के. पाटील आणि पाटील कुटुंबीयांनी महेंद्रशेठ घरत यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

यावेळी महेंद्रशेठ घरत यांनी डॉक्टरांना पुढील यशस्वी व्यावसायिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी नगरसेवक एकनाथ



गायकवाड, मिलिंद मोटघरे, रवींद्र कोट्यान, देवेंद्र चौधरी, किरण पाटील आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.